ानवार । ७ जून १९८० । ७५ पस

# माणूस

गाझा ही वाळवंटाची पट्टी. गॅलिली हे सरोवराचे नाव. मूळचे रखरखीत वाळवंट असलेल्या भूभागाचे इस्राइलने अक्षरशः नंदनवनात रूपांतर केलेले आहे. या पुरुषार्थी देशाला सारे जग आज शांततेचे, उपदेशाचे डोस पाजत आहे. भारतही याला अपवाद नाही.

पण अरब–इस्राइल–संघर्षात आज वादग्रस्त ठरलेल्या

## गोलान हाइट्सचा एक रहिवासी

### पुण्यातील एका तरुणाला यासंबंधी काय सांगत आहे ?

चालू वर्षारंभ अंकापासून सुरू होत असलेली नवी लेखमाला : पृष्ठ ५

अगदी अखेरच्या क्षणी त्याच्या एक गोष्ट लक्षात आली. त्याला अतिशय समाधान झालं. आपण नाही तरी मरणारच होतो. या मार्गानं आपण लवकर सुटू. ही आपल्यावर कृपाच आहे; पण तो आहे खूनच !

त्यानं प्रार्थना केली. आगळी–वेगळी प्रार्थना – ‘एखादा हुशार पोलीस अधिकारी इथे यावा . . . .’

**गेल्या अंकापासून क्रमशः सुरू झालेल्या हिचकॉक कथामालेतील दुसरी कथा....पृष्ठ १९**

## पुढे काय ?.... निवडणूक-लेख पुढील अंकी

# पुणे स्टेशन : प्लॅटफॉर्म क्र. १
# १ जून : सकाळी ७-२०

सकाळची सहा वाजताची वेळ. स्थळ–पुणे रेल्वेस्टेशन. सकाळी सहा वगैरे वाजता रेल्वे स्टेशनमध्ये प्रवासी म्हणून 'न' शिरणं याला कोणी काही म्हणो पण आजचं चित्र जरा वेगळंच होतं. स्टेशनसमोरचा रस्ता चकचकीत. आत शिरल्यावर पायाला, नाकाला वेगळंच वाटण्याइतकं चित्र पालटलं होतं. सगळं अगदी स्वच्छ आणि सुंदर! प्लॅटफॉर्मचीही गोष्ट तीच. दारावरचा टी.सी वगळता रेल्वेचे कधीही न ओळखू येणारे अधिकारी आज भट्टीच्या पाढऱ्या कपड्यात छातीवर बिल्ले लावून मिरवत होते. प्लॅटफॉर्मवर शुकशुकाट होता!

पण याच प्लॅटफॉर्मवरून ५० वर्षांपूर्वी भारतातली त्या वेळची सर्वांत जलद अशी डेक्कन क्वीन जेव्हा सुटली असेल तेव्हा हाच प्लॅटफॉर्म नुसता गजबजून गेला असेल! हे कुतूहल पाहायला कितीतरी लोक आले असतील. पण–त्यानंतर पन्नास वर्षं ही डेक्कन क्वीन अव्याहतपणे सकाळी मुंबईला जातेय. आणि संध्याकाळी मुंबईहून पुण्याला येतेय. एकदा सुरू झाल्यानंतर त्या गाडीकडे एक वाहन यापलीकडे फारसं कुणी पहायलं नाही. आज परिस्थिती वेगळी होती. उतारू, त्यांना सोडायला आलेले नातेवाईक आणि आमच्यासारखे, या सगळ्यांच्या मनात या दख्खनच्या राणीबद्दल एक वेगळीच प्रीती निर्माण झाली होती!

या राणीच्या अखंड ५० वर्षांच्या सेवेनंतर आज तिचा वाढदिवस, सुवर्णमहोत्सव साजरा होणार होता.

साडेसहा झाले आणि डेक्कन क्वीन स्वागताचा स्वीकार करीत,सन्मान स्वीकारीत प्लॅटफॉर्मवर आली. सर्व डब्यावर पताका, फुगे लावून ते सजविण्यात आले होते. (गाडी नेहमीपेक्षा अधिक स्वच्छ धुतल्यामुळे अधिक सुरेख दिसत होती–जणू 'न्हाउनिया उभी मी सुकवीत केस ओले। वेडया मुसाफिराने त्याचेच गीत केले।') प्रवाशांना आतमध्ये बसताना विलक्षण आदब वाटत होती. प्लॅटफॉर्मवरच्या स्पीकरवरून (जिथून नेमका तेवढा अर्थ न कळणारी वाक्ये तीन भाषात ओरडली जातात) सतारीचे स्वर बाहेर पड लागले आणि एका क्षणात प्लॅटफॉर्मचे स्वरूप बदलून गेलं. गजबज वाढली; पण त्यात या दख्खनच्या राणीला फक्त बघायला येणाऱ्यांचीच संख्या जास्त!

स्पीकरवरून एक कविता ऐकू आली,

सदैव आहे गर्व आम्हाला
आमुच्या रेल्वेचा
ध्यास मनिचा सदा सुचवितो
रस्ता प्रगतीचा।

सात वाजून पंधरा मिनिटं झाली आणि आम्ही इंजिनापाशी आलो. ड्रायव्हर अब्दुल खलिफ होते. गेली ३८ वर्षं ते रेल्वेत आहेत आणि या क्वीनला इलेक्ट्रिकचे इंजिन लागल्यापासून गेली २५ वर्षं ते या गाडीचे सारथ्य करत आहेत. खलिफना भरून आल्यासारखं झालं. इतकी वर्षं आपण ही गाडी मुंबईकडे नेतोय; पण आज आपल्याला अच्छा करायला इतके लोक जमलेत!

सात वाजून वीस मिनिटे झाली. घंटा वाजली आणि श्री. सी. एन. देशपांडे यानी हिरवा झेंडा फडकवला! गाडी मुंबईकडे धावू लागली प्लॅटफॉर्मवरच्या असंख्य चाहत्याकडून प्रेमाचं अभिनंदन स्वीकारीत!

गेली ५० वर्षे अव्याहतपणे प्रवाशांच्या सेवेस असलेली ही डेक्कन क्वीन प्रवाशांची सोबतीण आहे एका प्रवाशाने–तो गेली १२ वर्षं या गाडीने प्रवास करतोय–आज पेढ्याचा मोठा पुडा आणला होता. तोही खुषीत होता. या निर्जीवतेला सजीव करणाऱ्या प्रेमाचा अव्हेर 'डेक्कन' ने कधी केला नाहीये!

यापुढील अनेक वर्षं डेक्कनवर आमचा असाच लोभ राहण्यासाठी डेक्कनकडूनही काही अपेक्षा आम्ही करू नयेतच का?

–रांगेत उभे राहून कधीही 'डेक्कन'चे तिकिट न मिळालेला एक प्रवासी. ☐


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : पहिला
७ जून १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

# हिराबाईंचा ' गोड ' सत्कार

३१ मे ची रात्र. पुण्यातलं बालगंधर्व रंगमंदिर विद्युतरोषणाईने झगमगत होतं. फुलांच्या कमानीतून आत शिरलं की सनईचे सूर कानावर पडत होते. फुलाच्या गजऱ्याबरोबरच नाना प्रकारच्या अत्तरांनी व सेंटस्नी वातावरणात एक आगळीच मादकता आणली होती. किराणा घराण्याच्या ख्यातनाम गायिका श्रीमती हिराबाई बडोदेकर यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षं पूर्ण झाल्याबद्दल आज या रंगमंदिरात ' अमृतमहोत्सवी सत्कार ' आयोजित करण्यात आला होता. हिराबाईंच्या शिष्यांनीच पुढाकार घेऊन ही रात्र घडवून आणली होती.

नऊला पाचएक मिनिटं असताना हिराबाई रंगमंदिरात आल्या. अंगाने कृश, गतीमध्ये मंदपणा पण चेहऱ्यावरील आर्जव आणि सौजन्य तसंच कायम—अगदी पंचविशीत होतं तसं !

पुण्यातील प्रसिद्ध सनईवादनकार सूर्यकांत खळदकर यांच्या सनईवादनानंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम हिराबाईंच्या शिष्यांनी ' गानहिरा तू गुणरत्नांमधी दिपविलेस रसिका । दाविशी आम्हा गुरुपौर्णिमा होउनि तू चंद्रिका ' हे हिराबाईंना उद्देशून रचलेलं गौरवगीत गायलं. गौरवगीतानंतर मखमली पडदा बाजूला सरकला. रंगमंचावर सुधीर फडके, भीमसेन जोशी, फिरोज दस्तूर, वसंत शांताराम देसाई, माणिक वर्मा, उद्योगपती बा. म. गोगटे आणि स्वत: हिराबाई विराजमान झाल्या होत्या. प्रेक्षकांमध्ये जयमाला शिलेदार, कीर्ती शिलेदार, वामनराव देशपांडे, दत्तोपंत देशपांडे, ज्योत्स्ना भोळे, उस्मान खाँ इत्यादि संगीत क्षेत्रातील नामवंत मंडळी आवर्जून उपस्थित होती.

श्रीमती हिराबाई बडोदेकर अमृतमहोत्सव समितीच्या कार्यवाह सौ. उषा मुजुमदार यांच्या प्रास्ताविकानतर समितीचे स्वागताध्यक्ष बेळगावचे प्रसिद्ध उद्योगपती बा. म. गोगटे यांचं स्वागतपर भाषण झालं. श्री. गोगटे आपल्या भाषणात म्हणाले—

" आपल्या सुरेल आवाजानं आणि आर्जवी गाण्यानं गेली पन्नास वर्षं हिराबाईंनी संगीत रसिकांचं मन जिंकून घेतलं. ज्यांनी हे गायन ऐकलं ते खरोखरच धन्य होत ! गायनाबरोबरच सौजन्यशीलता हा हिराबाईंचा एक विशेष गुण. त्याना कधी रागावलेलं पाहिलंच नाही; पण कधी जर त्या चुकून-माकून रागावल्या असतीलच तर त्यांचं ते रागावणंही अतिशय सुरेल असेल !

हिराबाई मराठी रंगभूमीवर आल्या नि महाराष्ट्रातल्या स्त्रियांना कलेचं नवं दालन खुलं झालं त्यांच्या गायकीमध्ये हृदयाला भिडणारी करुणता आहे. आर्जव आहे. आक्रमकता न दाखवता मन कसं जिंकता येतं, हे हिराबाईंनी आपल्या गाण्यातून उत्तम तऱ्हेनं दाखवून दिलं.

' १९४०–४२ चा काळ असावा. पुण्यातल्या प्रभात थिएटरमध्ये हिराबाईंचा कार्यक्रम होता. सकाळी दहाचा सुमार असावा. एक झिपऱ्या केसांची तरुणी लगबगीनं प्रभात थिएटरच्या दिशेनं चालली होती. वाटेत तिचा मित्र भेटला; पण त्याच्याशी फारसं न बोलता ' मी हिराबाईंच्या गाण्याला चाललेय ' असं सांगून ती पुढं सटकली. त्या दिवशी हिराबाई शुद्ध सारंग गायल्या. संध्याकाळी तिला तिचा मित्र पुन्हा भेटला. तिनं त्याला सकाळी हिराबाईंनी म्हटलेला शुद्ध सारंग जसाच्या तसा म्हणून दाखवला आणि तिथेच तो तिच्या जीवननौकेचा सारंग बनला. ती तरुणी दुसरी–तिसरी नव्हती. ती माझीच भावी पत्नी होती. रसिकांना रिझवण्याबरोबरच त्याचं प्रेम आणि लग्न जुळवायलाही आपलं गाणं कारणीभूत झालं असेल हे हिराबाईंना कदाचित आजपर्यंत ठाऊकही नसेल !'

श्री. गोगटे यांच्या या गोड आठवणीनंतर समारंभाचे अध्यक्ष प्रसिद्ध नाटककार व समीक्षक वसंत शांताराम देसाई यांनी ज्योत प्रज्वलित केली. तसंच हिराबाईंचे जावई श्री. राजाराम हुमणे यांनी लिहिलेल्या ' धन्य जन्म जाहला ' या हिराबाईंच्या जीवनावरील चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशनही केलं. विविध व्यक्ती व संस्थातर्फे हिराबाईंचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला व ७५००-रुपयांची थैली त्यांना अर्पण करण्यात आली. या हृद्य सत्कारानंतर हिराबाईंविषयी कृतज्ञतापूर्वक बोलताना त्यांच्या शिष्या सौ. वृंदा लिमये म्हणाल्या,

' खर्च केल्यानं वाढणारं विद्याधन हिराबाईंनी आपल्या शिष्याना भरभरून दिलं आणि स्वत:च्या गायनाचा वारसा पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला. शिष्यांच्या वित्ता अपहरणापेक्षा चित्तापहरणाची कला हिराबाईंना जास्त अवगत आहे. त्यांच्यासारखं संगीताचं चालतं–बोलतं विद्यापीठ आम्हाला गुरु म्हणून लाभलं हे आमचं मोठं भाग्य आहे !'

गदिमांचं गीतरामायण महाराष्ट्रातल्या घरा–माजघरापर्यंत पोचवणारे स्वर श्री. सुधीर फडके यांनीही हिराबाईंच्या सौजन्यशीलतेची साक्ष पटवणारा अनुभव सांगितला—

' १९४५ साली मी एच. एम. व्ही. रेकॉर्ड–कंपनीत संगीतदिग्दर्शक म्हणून नोकरीला होतो. त्या काळात रेकॉर्डसवर संगीत दिग्दर्शकाचं नाव घालायची प्रथा

पृष्ठ २३ वर

दि. बा. मोकाशी

# महाभारताचे महाभारत !

येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ वाड्यात (१२४२ सदाशिव) सात मे पासून वासंतिक संस्कृत वर्ग सुरू झाले आहेत. येथे शिकावयास येणारे शिक्षक आहेत. या वर्गात पुण्यात जे वेळोवेळी वेंगवेगळे प्रकल्प झाले त्यासंबंधी त्या त्या प्रकल्पातील अधिकारी लोकांनी येऊन बोलावे अशी यंदा एक योजना होती. त्याप्रमाणे तीन प्रकल्पांवर तीन व्याख्याने आयोजित झाली होती. पहिले व्याख्यान डे. कॉलेजच्या 'संस्कृत महाकोष प्रकल्पा'वर डॉ. काशीकर यांचे झाले. दुसरे व्याख्यान भांडारकर इन्स्टिटयूटचे डॉ. व. ग. राहूरकर यांचे झाले. ते भांडारकर इन्स्टिटयूटच्या 'महाभारत' प्रकल्पावर बोलले. तिसरे व्याख्यान 'भारतीय पुरातत्व शास्त्राचे फलित' या विषयावर डॉ. म. के. ढवळीकर यांनी दिले. ही तीनही व्याख्याने विद्यापीठ वाड्यात संध्याकाळी साडेपाचला होती. तीनही व्याख्यानांचे संचलन विद्यापीठातील संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. कोपरकर यांनी केले.

या तीनही व्याख्यानांनी मला अतिशय आनंद दिला. ही व्याख्याने इतकी अनपेक्षित होती की ही तीनही हुकण्याचा संभव होता. व्याख्याने अतिशय माहितीपूर्ण झाली. त्यांत आलेले दोन प्रकल्पांचे व तिसरे 'भारतीय पुरातत्व तज्ज्ञांनी केलेले कार्य' हे तीनही विषय त्या त्या विषयात आयुष्य घालविलेल्या व्यक्तींनी मांडल्यामुळे अतिशय थोड्या वेळात आपापल्या कार्याचे चित्र त्यांनी उभे केले. यापैकी संस्कृतकोश काय किंवा महाभारताची चिकित्सक आवृत्ती काय किंवा उत्खनन काय ही सर्व दीर्घकालाची, अत्यंत परिश्रमाची कार्ये होती. या तीनही कार्यांना जागतिक महत्त्व आले आहे. ही व्याख्याने वर्तमानपत्रात जाहीर झाली असूनसुद्धा पंचवीसएक श्रोत्यांहून जास्त श्रोते नव्हते. या व्याख्यानांना न आलेले नागरिक लहानशा ज्ञानयज्ञाला मुकले असेच मी म्हणेन !

या तीन व्याख्यानांपैकी दि. २६-५-१९८० या दिवशी झालेले डॉ. वसंतराव राहूरकर यांचे, 'भांडारकर इन्स्टिटयूटचा महाभारत प्रकल्प, हे व्याख्यान मी देणार आहे. महाभारत हा विषय सर्वांच्याच जिव्हाळ्याचा आहे. असंख्य लेखक, कवी, नाटककार, चित्रकार, प्रवचनकार यांनी उपसूनही तो आटला नाही ! अनेकांनी महाभारतावर आपल्या कल्पना लढवून त्याची ओढाताण केली; पण त्याचे रूप आहे ते आहे. कित्येक लेखक-कवींनी दंड थोपटून व्यासांची पात्रे सुष्टाची दुष्ट व दुष्टाची सुष्ट करून पाहिली–नायकाचा खलनायक केला, खलनायकाचा नायक केला. त्यातल्या घटना उलटया-सुलटया केल्या. आजच्या राजकारणाचा रंग त्यांना दिला. कुणी त्यांतील पात्रांचे वागणे फ्राइडमध्ये बसविले, नव-मानसशास्त्राने नटविले; पण ज्या काळाला खूष करण्यासाठी त्यांनी हे केले तो काळ मागे पडताच त्यांचे महाभारत, म्हणजे त्यांनी महाभारताचा नटवलेला भाग मागे पडून विस्मरणातही गेला ! उरले काय ? तर त्यांनी व्यासांना न दिलेल्या रॉयल्टींचा बोजा !

¤

डॉ. द. गं. कोपरकर यांनी व्याख्यात्यांची ओळख करून दिली. ते म्हणाले, 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळातर्फे जे संशोधन चालू असते त्यात सहभागी असलेल्या डॉक्टर राहूरकर यांना आम्ही त्यांच्या संस्थेत जे महाभारताच्या चिकित्सित आवृत्तीचं काम झालं आहे त्याबद्दल येथे सांगावं, अशी विनंती करतो. आमच्या विनंतीला मान देऊन दे इथे आले आहेत. महाभारताच्या चिकित्सित आवृत्तीबद्दल ते आपणास सांगतील.'

डॉ. वसंतराव राहूरकर म्हणाले,' संस्कृतप्रेमी बंधुभगिनींनो, भांडारकर इन्स्टिटयूटने हाती घेतलेला महाभारताचा चिकित्सित आवृत्तीचा प्रकल्प पूर्ण झाला. संपूर्ण जगात गाजला ! तो पुरा करण्यात भारतीय तसेच बाहेरचेही पंडित सहभागी होते. भांडारकर इन्स्टिटयूटने हा प्रचंड प्रकल्प कशासाठी हाती घेतला ? महाभारताचं सांस्कृतिक महत्त्व काय आहे ? 'महत्त्वात् भारतत्वाच महाभारतमुच्यते' हा ग्रंथ भारतीय संस्कृतीची माहिती करून देतो. इतिहासाची माहिती देतो. 'धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ। यदि हास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित ।। धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यासंबंधी जे जे या ग्रंथात आले आहे ते अन्य ग्रंथांत सापडेल; पण या महाकाव्यात जे आलेले नाही ते इतरत्र आढळणे अशक्य ! अशी या महाकाव्याची महती आहे. हा जागतिक महत्त्वाचा ग्रंथ आहे. माणुसकीशिवाय अधिक उदात्त काही नाही असं सांगणारा हा ग्रंथ आहे. साहित्यदृष्टीने हा मूलाधार ग्रंथ आहे !

अशा या दिव्य महाकाव्याची त्याचे महत्त्व जाणून चिकित्सित आवृत्ती तयार करण्याचे काम भांडारकर इन्स्टिटयूटने हाती

घेतले. महाकाव्याची चिकित्सित आवृत्ती हवी असण्याचे कारण होते. ही चिकित्सित आवृत्ती पूर्ण झाल्यानंतरच्या स्मरणिकेत याचे कारण दिले आहे. विस्तारात प्रचंड आणि अनेकविध विषय असलेले हे महाकाव्य एका कवीने किंवा एका पिढीतील अनेक कवींनी रचले असणे उघडच अशक्य होते. काही शतके कवींच्या काही पिढ्यांनी या काव्याला हातभार लावला. प्रथम ते जय नावाचे काव्य होते. कालांतराने त्यात कविभाटांनी विस्तार केला. कृष्णपंथीयांनी संस्कार केले व 'जय' कवितेचे महाकाव्य भारत तयार झाले. या सूतपरंपरेतील काव्यावर ब्राह्मणीजीवन व विचार यांचा पगडा पडून, शेवटी त्याचे 'महाभारत' झाले!

या महाभारताच्या एक लाख संहिता झाल्या. या आवृत्त्या व प्रतिआवृत्त्या यांच्या संख्येने गोंधळ उत्पन्न केला. जितकी हस्तलिखिते तेवढी महाभारते अशी स्थिती होती. भांडारकर प्राच्य विद्या संस्थेने महाभारताची एक चिकित्सित आवृत्ती काढण्यास या असंख्य आवृत्तीतील गोंधळ कारण झाले. प्रत्येक हस्तलिखित निराळे होण्याचे कारण महाभारत हे अनेक शतके भाटांच्या अनेक पिढ्यांनी गाइले व मुळात काही विकृती अनाठायी विस्तार यांची भर पडत गेली. या महाकाव्याच्या पोथ्या झाल्यानंतर काही काळ ही स्थिती होती. खुद्द महाकाव्यातच याला साक्ष मिळते. व्यासाच्या सुमंति, शुक, वैशंपायन आदी शिष्यांच्या संदर्भात 'संहितास्तैः पृथक्त्वेन भारतस्य प्रकाशिताः।' याचा अर्थ महाकाव्याच्या आरंभीच्या काळातही त्याच्या आवृत्त्या होत्या असा होतो.

महाभारताच्या या असंख्य आवृत्तींतून एक चिकित्सित आवृत्ती तयार करण्याची पहिली कल्पना वुइटरनिट्झ या परदेशीय पंडिताची. पॅरीस येथे १८१७ साली भरलेल्या प्राच्यविद्या पंडितांच्या आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसच्या अकराव्या परिषदेत त्यांनी ही कल्पना मांडली. अशी चिकित्सित आवृत्ती, महाभारताच्याच नव्हे तर सर्व भारतीय महाकाव्यांच्या अभ्यासासाठी पाया होऊ शकेल! इ. स. १८३४-३९ या काळात कलकत्त्यात महाभारत चार भागांत प्रथम छापले. यानंतर पोथीच्या आकाराची एक आवृत्ती इ.स. १८६२ मध्ये लिथोवर गणपत कृष्णाजी यांनी मुंबईत काढली.'

¤

डॉ. राहूरकर भाषणात पुढे म्हणाले,

ही चिकित्सित आवृत्ती तयार करणे फार कठीण काम होते. महाभारताची हस्तलिखिते अनेक होती. ती अनेक लिप्यांतून व भाषांतून होती. त्यांतील मजकूर भिन्न होते. उत्तरेकडील व दक्षिणेतील हस्तलिखितांत फरक होते. त्यासाठी जागोजागी तेवढ्या संख्येने विद्वान हवेत. प्रत्येक श्लोक घेऊन त्या त्या लिपीतील पंडिताकडून चिकित्सा करून घेणं व नंतर तो भांडारकर इन्स्टिट्यूटकडे आणणं, तेथे इतर आवृत्तींशी त्याची छाननी करणं अशा तऱ्हेने काम सुरू झाले. सर्वांआधी हस्तलिखित पुरे आहे का ते पहावे लागे. एकूण १२५९ हस्तलिखितांचे परीक्षण होऊन त्यांतली ७३४ हस्तलिखिते प्रत्यक्ष उपयोगात आली. प्रत्येक हस्तलिखित एक लाख श्लोकांचे! तेव्हा हे काम किती चिकाटीचे व अडचणीचे होते हे कळेल. शारदा, काश्मिरी नवी व जुनी, नेपाळी, मैथिली, बंगाली, देवनागरी, तेलगु, तामील, मल्याळम इतक्या लिपींतील हस्तलिखिते पहावी लागली. भाषांतरकेंद्रे निवडली. कोयलेशन शीट्स मागवल्या. बाहेरचे चार पंडित होते. १ चरण घ्यावयाचा व विविध हस्तलिखितांतील फरक बघून नोंदवावयाचा; अशी पद्धती अवलंबिली.

चिकित्सित आवृत्ती बाहेर पडेपर्यंत एकूण पंधरा लाख त्रेचाळीस हजार सत्तेचाळीस इतके रुपये खर्च आला! १९२५ साली आरंभिलेले हे कार्य १९६६ साली पूर्ण झाले! दि. २२ सप्टेंबर १९६६ या दिवशी डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते चिकित्सित महाभारताचा प्रकाशनसमारंभ झाला!

¤

महाभारतावरचे हे व्याख्यान जो वाडा पूर्वी आमच्या या भागात 'भुताचा वाडा' म्हणून प्रसिद्ध होता त्या वाड्यात झाले. ४६ सालापर्यंत त्याला 'भुताचा वाडा' हे नाव होते. भुताचा वाडा हे नाव पडण्याचे कारण जवळजवळ या वाड्यासमोरच चाफेकरप्रकरणातील प्रसिद्ध द्रविडबंधूंना मारण्यात आले. त्यांची भुते या वाड्यात असावी अशी समजूत होती, या वाड्याचे नाव चिटगुप्पीचा वाडा असे होते. तो वासुकाका जोशी यांनी घेतला. नंतर तो धोंडुमामा साठे यांचा झाला. १९४३ मध्ये हा वाडा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने घेतला. तेव्हापासून तेथील भुते पळाली! तो वाडा विद्यापीठवाडा या नावाने ओळखला जातो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना ६ मे १९२१ या दिवशी झाली. (सध्या) जे शिक्षण मिळते ते हुशार व नेभळे नोकर तयार करण्यासाठी मिळते–राष्ट्रीय शील, उमेद, उद्योग वाढविण्यासाठी नाही! ... "विद्यार्थ्यास राष्ट्रीय शिक्षण मिळण्याचा मार्ग म्हणजे राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करणे होय–" लो. टिळक यांच्या या म्हणण्याप्रमाणे टि. म. विद्यापीठाची स्थापना झाली. प्रारंभी वाङ्मयशाखा, व्यापारशाखा, स्थापत्यशाखा, आयुर्वेदशाखा होत्या. राष्ट्रीय विद्यापीठ म्हणून स्थापन झालेल्या या विद्यापीठातील विद्यार्थी राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहणं शक्य नव्हते. तसे होऊन १९३२ च्या सुमारास ही संस्था बेकायदेशीर ठरली. तोपर्यंत येथून तीनशेपन्नास पदवीधर बाहेर पडले होते. मला आठवतंय माझे मधले बंधू आयुर्वेद शाखेत शिकत होते. ती सर्व मुले बागलाणच्या जंगल-


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

# देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

सत्याग्रहात सहभागी झाली. या मुलाचे खंडित शिक्षण पुढे नगरच्या आयुर्वेद विद्यालयाने पुरे केले.

टिळक महाविद्यालयाचे पुनरुज्जीवन १९७५ मध्ये करण्यात आले. त्याआधीच गुलटेकडी विभागात जागा मिळाल्यामुळे तेथे बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाची इमारत बांधण्यात आली. आता या संस्थेचे कार्य विद्यापीठ वाडा, सदाशिव पेठ व गुलटेकडी येथील वास्तु या दोन्ही ठिकाणी सुरू आहे ◻

महाभारताची चिकित्सित आवृत्ती काढली म्हणजे काय केले हे सांगताना डॉ. राहूरकर म्हणाले,

'चिकित्सित आवृत्ती काढली म्हणजे व्यासांचे मूळ महाभारत शोधले नाही. ते शक्यच नव्हते. महाभारताची पुनर्रचना केली काय? नाही. जनमेजयासमोर वैशंपायन यानी म्हटलेले किंवा सूताने शौनकासमोर गाइलेले महाभारत शोधले काय? तेही नाही. महाभारत व्याकरणदृष्ट्या शुद्ध केले काय? नाही. चिकित्सित आवृत्तीचे रूप आर्ष आहे. त्यात भाषासौष्ठव दिसणार नाही; पण हे रूप मूळ महाभारताचे द्योतक आहे.

सातशेपन्नास निरनिराळी महाभारते निरीक्षून जो आत्मविश्वास निर्माण झाला त्यावरून मूळ महाभारत कसे असेल हे ठरविण्याचा यत्न केला. आता जी चिकित्सित प्रत तयार झाली ती उपलब्ध हस्तलिखितांतील सर्वांत जुन्या महाभारतासारखी झाली असण्याचा संभव आहे. परंपरेनं आपल्यापर्यंत प्रत्यक्ष आलेलं हस्तलिखित महत्त्वाचं ठरवून चिकित्सा करताना अशाच आवृत्तीचा उपयोग केला. यातून जुन्यात जुन्या हस्तलिखितांजवळ जाण्याचा यत्न होता. शेवटी जी चिकित्सित आवृत्ती उभी राहिली आहे, ती आज उपलब्ध असलेल्या महाभारताच्या सर्व पोथ्यांची पूर्वज असेल असे म्हणावयास हरकत नाही!

चिकित्सित आवृत्तीत आणखी एक गोष्ट केली. महाभारतात जी आधुनिक भर पडली होती ती काढून टाकली आणि सर्व पुनरुक्ती काढल्या. महाभारताच्या या चिकित्सित आवृत्तीचा दावा असा मांडता येईल की, (१) देशातील महाभारताच्या महत्त्वाच्या अशा सर्व उपलब्ध पोथ्या विचारात घेतल्या. (२) त्या परस्परांशी ताडून पाहिल्या आणि त्यांची दखल घेतली. (३) विविध तऱ्हेची तुलनात्मक प्रमाणे वापरण्यात आली आणि (४) सर्वांत विशेष म्हणजे ज्याला काही महत्त्व आहे असे सर्व पाठांतरभेद प्रत्येक पानाखाली देण्यात आले. त्यामुळे वाचकाला पोथीतील प्रत्येक उताऱ्याचा पुरावा पहिल्यांदा एकत्र उपलब्ध झाला. या महाकाव्याचे शास्त्रीय संशोधन करावयास निघालेल्यांस या गोष्टीचे महत्त्व पटेल. भांडारकर प्राच्यमंडळाने काढलेली ही महाभारताची चिकित्सित आवृत्ती आतापर्यंतच्या सर्व महाभारताच्या पोथ्यांहून परिपूर्ण अशी प्रत आहे. ही महाभारताच्या परंपरेतली शब्दसंहिता आहे. हिला तोड नाही!'

एप्रिल १९१९ मध्ये रामकृष्ण गोपाळ भांडारकर यानी पहिल्या तौलनिक तत्त्वावर महाभारतातील पहिला श्लोक लिहिला—

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्।
देवी सरस्वती चैव ततो जयमुदीरयेत्॥

हा पहिला श्लोक लिहून या चिकित्सित आवृत्तीचा तात्पुरता मुहूर्त केला. भारतीय विद्वत्तेच्या इतिहासात हा क्षण फार मोठा होता. हे कार्य फारच फारच प्रचंड होते! इ. स. १९२५ पासून सुखटणकरांच्या संपादकत्वाखाली महाभारताच्या चिकित्सित आवृत्तीचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. आदिपर्वाच्या आरंभी त्यानी प्रस्तावना दिली व ज्या तत्त्वावर चिकित्सित आवृत्ती उभी केली ती तत्त्वे सांगितली. १९४३ पासून बेलवलकरांच्या व १९६१ नंतर वैद्य यांच्या नेतृत्वाखाली काम चालू राहिले. १९६६ साली सर्व काम पुरे झाले!

यापुढील महाभारतावरील संशोधनासाठी ही चिकित्सित प्रत मूलाधार राहील असे सांगून डॉ. राहूरकर म्हणाले, 'वसंत व्याख्यानमालेत भीष्मावर बोलताना नरहर कुरुंदकर म्हणाले की, 'आपण भीष्माबद्दल जे सांगणार आहोत ते भांडारकर इन्स्टिटयूटच्या महाभारताच्या चिकित्सित आवृत्तीवरून नाही. ती आवृत्ती बाजूला राहू द्या. मी इतर आवृत्तीवरून बोलणार आहे.' नरहर कुरुंदकरानी चिकित्सित आवृत्ती बाजूला ठेवली; पण त्याचे म्हणजे चूक आहे. चिकित्सित आवृत्ती बाजूला ठेवणे चूक आहे. आता विद्वानांनी असं बोलू नये! ◻

यानंतर काही प्रश्नोत्तरे झाली. त्या प्रश्नांची उत्तरे देताना डॉ. राहूरकर म्हणाले, 'रामकथेचा उल्लेख चिकित्सित आवृत्तीत आहे. चिकित्सित आवृत्तीचे पंचवीस खंड आहेत व किंमत हजारपर्यंत असावी! या आवृत्तीत गीता आहे. अशी थोडीच प्रश्नोत्तरे होऊन व्याख्यान संपले. डॉ. कोपरकर यांनी वक्त्यांचे आभार मानले.

भांडारकर इन्स्टिटयूटने काढलेल्या महाभारताच्या या चिकित्सित आवृत्तीमुळे नरहर कुरुंदकरांसारख्या विद्वानाची पंचाईत झालीच आहे; पण ललित लेखकाची तेवढीच पंचाईत झाली. त्यांना काल्पनिक कथाभागावर आणखी काल्पनिक कथाभाग रचता येणार नाही! महाभारताला नवे वळण लावण्याच्या पुष्कळांच्या महत्त्वाकांक्षा आता थंडावतील! तसेच आपण लिहिलेला महाभारताचा पुनर्लिखित भाग महाभारताच्या संहितेत एकरूप होण्याच्या काहींच्या आशा विरतील!

" तद्दन शांतताप्रिय, सभ्य जग काहीही म्हणो, गोलान हाइट्सचा एक रहिवासी म्हणून मी सांगतो की हे ठिकाण आम्ही कधीही सोडणार नाही ........"

पुण्याच्या राजू पटवर्धनला इस्राइलचा नाखूम सांगत होता.....

राजू पटवर्धन गोपालन आणि दुग्धोत्पादन या विषयांच्या प्रगत अभ्यासक्रमासाठी इस्राइलला नुकताच दोन महिन्यांसाठी जाऊन आलेला पुण्यातील एक तरुण पदवीधर. दुग्धोत्पादनात सध्या इस्राइलची गाय पहिल्या क्रमांकाची आहे. ( तिचं सरासरी उत्पादन एका वेतात ६५०० लिटर. आपल्या भारतीय गोमातेचं ४५० लिटर ! ) या दोन महिन्यात राजूला दुग्धव्यवसायातील प्रगत ज्ञानाबरोबरच संपूर्ण इस्राइल देशही बघायला मिळाला. तिथल्या किबुट्झ, मोशाव्ह इत्यादी वसाहतींतील रहिवाश्यांबरोबर गप्पा मारायला मिळाल्या. अरब–इस्राइल संघर्षातील दोन्ही बाजूंच्या भूमिका–जाणिवा समजून घेता आल्या. एका विशिष्ट इतिहासामुळे ज्यूंमध्ये निर्माण झालेली. जाज्वल्य अस्मिता व राष्ट्रभक्ती यांचे प्रत्यक्ष दर्शन घडले.

वाचकांना आठवत असेलच की १९६८ च्या ' माणूस ' दिवाळी अंकात या राजूची अमेरिकेहून लिहिलेली पत्रे प्रसिद्ध झालेली होती. त्या वेळी ती पत्रे अनेकांना आवडलीही होती. आचार्य अत्रे हे त्यांपैकी एक नाव. अमेरिकेच्या सर्वच बाबतीत असलेल्या प्रचंडपणाला भांबावून न जाता सामोरे गेलेल्या राजूने सहजपणे आपले मनोगत, आपल्या आशा–आकांक्षा या पत्रातून व्यक्त केल्या होत्या.... मूळच्या सेल्स इंजिनियर असलेल्या राजूने हौसेने, धाडसाने दुग्धोत्पादनक्षेत्रात पाऊल टाकलेले आहे. सध्या तो सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे शेती–दुग्धव्यवसाय करत आहे....

अरब–इस्राइल संघर्ष, भारताचे धोरण याबाबत प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिल्यावर राजूची काही वेगळी मते तयार झाली. या लेखमालेत तो ती ओघाओघाने मांडणार आहे. गाझा ही वाळवंटाची पट्टी. गॅलिली हे सरोवराचे नाव. मूळचे वाळवंट असलेल्या या भागाचे इस्राइलने नंदनवन कसे बनवले हे या ' गाझा ते गॅलिली ' लेखमालेत सांगण्याचा राजूचा प्रयत्न. एकूण ६।७ लेख होतील असा अंदाज आहे....



# गाझा ते गॅलिली

## लेखांक पहिला । राजू पटवर्धन

' तू काही म्हण, नाखुम, पण मला स्वतःला खरेच असे वाटतेय की, तुम्ही इस्रायली लोक अकारण ताठरपणे आणि आडमुठेपणाने वागताय्. हे बघ, मी इस्राइलचा मित्र आहे. तुमचे शौर्य, चिकाटी, प्रयत्नशीलता आणि तुमची नेत्रदीपक प्रगती मी गेला दीड महिना प्रत्यक्षच पाहतोय्; पण जॉर्डन नदीचा पश्चिम किनारा आणि गोलान हाइट्स् न सोडणे हे मला आडमुठपणाचे वाटते. तुम्ही काही म्हटले, तरी जगाच्या अख्त्यारी तो प्रदेश अरबांचा आहे. तो तुम्ही जोपर्यंत त्यांना परत करीत नाही, तोपर्यंत या संघर्षाला काही अंतच नाही !'

' राजू, तद्दन सभ्य, शांतताप्रिय आणि स्वतःची प्रतिमा उजळायला मदत करणारी तुझी मते आहेत. तूच काय, पण आमचे ' ग्रेट ' अमेरिकन मित्र, एवढेच काय, आमच्या तेल अव्हिव्हमध्ये राहणाऱ्या पांढरपेशांची हीच मते आहेत. ' कशाला व्यापायच्या त्या गोलान हाइट्स् आणि कशाला हवे ते युद्ध ?' पण सॉरी, जग काही म्हणो, आमचे स्वतःचे सरकार काही करो. मी एक गोलान हाइट्स्वरचा रहिवासी म्हणून तुला सांगतो, की आम्ही गोलान कालत्रयी सोडणार नाही !'

' पण ही अतिरेकी भूमिका का ?'

'अतिरेकी'–हाच तो शब्द–आला! खुद्द माझे स्वकीय मित्र मला 'एक्स्ट्रिमिस्ट्,' 'रॅडिकल' वगैरे म्हणतात, खुशाल म्हणा! पण लक्षात ठेवा, माझ्यासारखे लोक आहेत, म्हणून इस्रायल हे राष्ट्र आज जिवंत आहे. गोलन हाइट्स् म्हणजे आमचा प्राण आहे!'

'नाखुम, मला नाही वाटत.'

'मग तू गोलान हाइट्स् बघच. तिथून आमचे हैफा शहर बघ, दुर्बिण असली तर सबंध इस्राइल खोरे बघ. सीरियाचे स्थान बघ आणि मग काय ते मत बनव!'

मी आणि ३५ वर्षे वयाचा माझा इस्रायली मित्र नाखुम हारेल असा वाद घालत होते. गोलान हाइट्स आणि सीरिया यांच्या अगदी सरहद्दीवर नाखुम राहतो. तिथल्या 'यमात माक्षिमीम' नावाच्या किबुट्झ्चा (सामूहिक नगर) तो सभासद आहे. पाच हजार एकरांहून जास्त रानावर चरणाऱ्या सुमारे बाराशे गाईंची देखभाल करणाऱ्या सहाजणांपैकी तो एक आहे.

नाखुमशी माझी विशेष दोस्ती होण्याचे कारण म्हणजे ज्या संस्थेत आमचा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणवर्ग चालू होता, त्या रूपिनमध्ये इस्राइली लोकांसाठीच फक्त असलेल्या हिब्रूमधल्या वर्गाला तो आलेला होता. त्याचे वडील मूळचे इंग्लंडमधले. दुसऱ्या महायुद्धात सहा वर्षे ते कलकत्त्याला होते. नंतर ते इस्राइलला स्थायिक झाले. त्यांच्याकडून भारताबद्दल खूप हकीगती नाखुमला कळल्या होत्या. त्याने ठरवले होते की, जेव्हा संधी मिळेल, तेव्हा भारतीयांशी ओळख करून घ्यायची व भारताबद्दलची आपली जिज्ञासा तृप्त करावी. मी व डहाणूचे डॉ. मोडक रूपिनमध्ये आलोय् हे कळल्यावर तो आपण होऊन आम्हाला भेटायला आला.

आमचा वाद काही संपत नव्हता.

'हे पहा राजू, आम्ही काही १९६७ मध्ये नासरला आणि त्याच्या अरबांना सांगितले नव्हते आमच्यावर हल्ला करायला. २९ मे १९६७ ला नासरने बेगुमानपणे जाहीर केले की, 'हे युद्ध एकाच हेतूने होईल–तो म्हणजे इस्राइलचा सर्वनाश!' आम्हाला पर्यायच नव्हता. ५ जून १९६७ पासून सहा दिवसात आम्ही सगळा नासर आणि त्याच्या अरबांचा धुव्वा उडवला आणि सिनाई, गोलान, गाझा, जॉर्डन नदीचा पश्चिम किनारा–हे सर्व व्यापले म्हणून आजतागायत तग धरून आहोत!'

'पण शांतता प्रस्थापित करायची म्हणजे काही नरमाईही आलीच. काही तडजोडही आलीच. असे गुर्मीत आडमुठे वागून काय उपयोग?–मी.

'हे सगळे तुम्हाला बोलायला छान आहे; पण आज अशी परिस्थिती आहे की, गोलान म्हणजे माझ्या दृष्टीने कमाल सुरक्षितता आहे. ही सुरक्षितता मी घालवू इच्छित नाही, कारण मी आणि माझ्यासारख्याच इस्राइलींनी ती विलक्षण ताण आणि किंमत सोसून मिळविलीय्. भारतात तुम्ही मजेत आहात; तू कधीही युद्धात भाग घेतला नाहीस. तुम्हाला सैन्यात जाण्याची सक्ती नाही. इथे मी १८ ते २१–३ वर्षं सक्तीमुळे सैन्यात होतो. त्यानंतर १९६७ च्या सहा दिवसाच्या युद्धात, १९६९–७३ पर्यंतच्या 'जैसे थे' युद्धात आणि १९७३ च्या युद्धात मी भाग घेतला. आता सर्व इस्राइली पुरुषांप्रमाणे ५५ व्या वर्षापर्यंत दर वर्षातून एक महिना मला सैन्यात जावे लागणार आहे. हे सर्व ताणचक्र माझ्या मुलांना सहन करावे लागणार आहे. मुलींनाही! त्यांना वयाची १८ ते २१ वर्षे सैन्यात जावेच लागते. इतके जर आम्ही सोसतोय्, तर मग या कष्टांच्या गोलान हाइट्स्रूपी बक्षिसावर आम्ही असे पाणी सोडले तर आमचा देश राहण्याच्या लायकीचाच राहणार नाही!'

'पण हे करावेच लागते. १९६५ मध्ये भारताला हाजीपीर खिंड व कारगिल टेकडी, ज्या दोन्ही गोष्टी आम्ही अपरिमित किंमत देऊन जिंकलेल्या होत्या, त्या पाकिस्तानला परत द्याव्याच लागल्या.'

'घटकाभर कल्पना करू, अगदी सबंध काश्मीर तुम्ही पाकिस्तानला दिलेत, तरी तुमचा भारत टिकून आहे. तुमचा पंजाब आहे, महाराष्ट्र आहे वगैरे वगैरे. सध्या सीरियाकडे अशी शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा आहे की, 'गोलान'वरून जवळ जवळ सबंध इस्राइल त्याच्या तोफेच्या टप्प्यात आहे. एकदा का 'गोलान' सोडले की, आमच्याकडे तुमच्यासारखे राखीव प्रदेश नाहीत. पंजाब, दक्षिण हिंदुस्थान वगैरे. आम्हाला जायला दोनच जागा आहेत. भूमध्य समुद्र किंवा तांबडा समुद्र.'

यानंतर पुढचा वाद आम्ही खुद्द गोलान हाइट्स्वरच घालायचे ठरवले. जाताना १९६७ आणि १९७३ दोन्ही युद्धाच्या निशाण्या पदोपदी दिसत होत्या–मोडके रणगाडे, उद्ध्वस्त बिनतारी ठाणी, पडक्या भिंती, मातीत कायमच्या रुतलेल्या ट्रक्स वगैरे अजूनही धोक्याच्या सूचना दिसत होत्या की शत्रूने पुरून ठेवलेले सुरुंग अजूनही शिल्लक आहेत.

गोलान हाइट्स् हा प्रदेश इस्राइलने जिंकला आहे, जप्त केला आहे, व्यापला आहे इत्यादी वर्णनापेक्षा जास्त सयुक्तिक वर्णन असे होईल की, हा प्रदेश आत्मसात केला आहे. एवढेच नव्हे तर तेथे अत्याधुनिक राजमार्ग, उपहारगृहे आणि हॉटेले यांचे जाळे एवढे विणले आहे की, जणु प्रवाशांच्या गर्दीत शत्रुपक्षाला वाटच सापडू नये! इस्राइलला येणारा जवळजवळ प्रत्येक पर्यटक गोलानला गेल्याशिवाय राहत नाही.

गोलानमध्ये सीरियाच्या सगळ्यात जवळ म्हणजे कुनित्रा या सीरियन शहरापासून १ किलोमीटरपर्यंत आम्ही गेलो होतो. गोलानमधील उच्चतम शिखर हे हर्मन पर्वतावर (हिब्रूमध्ये 'हर्मन'चा उच्चार 'खर्मन'ला जास्त जवळ आहे.) सुमारे ८५०० फूट उंचीचे आहे. गोलानमध्ये गेल्यावर हे दिसून येते की, इस्राइलची सर्व भूमी गोलान हाइट्स्च्या पायाशी शरण आहे. १९६७ च्या आधी जवळजवळ प्रत्येक टेकडीवरून सीरियन सैनिक तोफांचा भडिमार खालच्या इस्राइली वसाहतींवर करीत होते. अगदी हैफा शहरावर ६७ च्या युद्धात तोफगोळे येऊन पडले आहेत. १९६५ च्या युद्धात लाहोरमध्ये पाकिस्तानने कॉंक्रीटच्या 'पिल्–बॉक्सेस्' जशा उभ्या केल्या होत्या, तशा सीरियाच्या या टेकड्यांवर होत्या. यातली प्रत्येक टेकडी इस्रायली सैनिकांनी ६७ च्या युद्धात खालून वर रणगाडे आणि पायी हल्ले करून अमाप जीवितहानी सोसून जिंकली! आज जवळजवळ प्रत्येक टेकटीवर स्मारक-स्तंभ दिसतील. त्यावर ती टेकडी सर करताना मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांची नावं कोरलेली आहेत.

गोलानच्या खालच्या शेतकी वसाहतीतल्या खूप जणांनी आम्हांला सांगितलं की, ६७ च्या आधी जवळजवळ रोजच सीरियन हल्ल्याचा

धोका असे. शेतीसाठी वापरलेला ट्रॅक्टर खूप वेळा रणगाडा म्हणून वापरावा लागे. तिथले सगळे लोक सांगत होते की, ६७ नंतर कधी नव्हती एवढी शांतता दैनंदिन जीवनात मिळाली आहे. आता प्रत्येक टेकडीवर इस्राइली सैनिकांची टेहळणी चालू असते. त्यांची सीरियन सैन्यावर सूक्ष्म नजर असते.

मात्र नागरी जीवन अगदी सुरळीत दिसतं. उदा.–हर्मन पर्वताच्या पायथ्याशी ड्रूज नावाचे काहीसे गूढपंथाचे दहा हजार लोक राहतात. ते दिसायला युरोपियन दिसतात. इस्राइलशी एकनिष्ठ आहेत. मात्र त्यांचा धर्म व भाषा दोन्ही गूढ आहेत. ते एकत्र राहतात. इतर समाजात मिसळत नाहीत. मात्र त्यांचं जीवन आनंदी वाटतं.

'मग राजू, आता तुला काय वाटतंय् ? जर तू इथला रहिवासी असतास, तर गोलान हाइट्स् सोडल्या असत्यास ?'

मी निरुत्तर झालो.

### विखुरलेली संरक्षणव्यवस्था

मला सगळ्यात आश्चर्य या गोष्टीचं वाटलं की, गोलान हाइट्स् काय, गाझा पट्टी काय, सिनाई वाळवंट काय, इस्राइलचं धोरण तिथे नागरी वसाहती वसण्यावर आधारलेलं आहे. गोलानमध्ये शक्य तिथे सफरचंद आणि गहू लावून तिथे मोठी शेती उभी केली आहे. जिथे टेकड्यावर जमिनीची मशागत करणं अशक्य आहे, तिथे ५००० ते ८००० एकरांचं एक अशी गाईंची (केवळ मांसासाठीच्या गाई–बीफ काउज्) कुरणं केली आहेत–या प्रदेशाची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीनं.

'नाखुम, तुम्ही नागरी वसाहती सीमेवर बाधता, म्हणजेच अरब गनिमाना तुम्ही 'रेडी-मेड' लक्ष निर्माण करून देता की नाही ? आणि, तुमचं सरकार काय म्हणतं की, नागरी वसाहती या संरक्षणाच्या अविभाज्य घटक आहेत म्हणून ? मला हे धोरण विचित्र दिसतं.'

'सरकाचे प्रवक्ते काही म्हणोत. खरी गोष्ट ही आहे की, माझ्यासारखे लोक जेव्हा माझ्या अल्पस्वल्प खाजगी मालमत्तेसह सीमेवर राहतात, तेव्हा शत्रूचा हल्ला झाला तरी स्वत:च्या संपत्तीसाठी म्हणून तरी प्राण जाईपर्यंत लढतात. नुसतीच सैनिकी ठाणी स्थापली, तर सैनिकाची वैयक्तिक मालमत्ता काहीच गुतलेली नसते. शत्रूचा हल्ला झाल्यावर प्रसंगी सैनिक पळसुद्धा काढतील; पण स्थिरावलेले नागरिक शेवटपर्यंत झुज देतील. हे धोरण निष्ठुर आणि कटु वाटलं, तरी ते पाळणं आम्हाला भाग आहे. कारण या छोट्या वसाहतीच आमचं रक्षण करू शकतात. आम्ही सगळे जेरुसलेम, हैफा, तेल अव्हिव्ह, नेतान्या अशा मूठभर शहरात राहिलो, तर आमचा पराभव करणं शत्रूला अगदी सोपं जाईल. आम्ही विखुरलेले आहोत म्हणूनच झुज देऊ शकतोय् !'

'याचा अर्थ दररोज शत्रूच्या हल्ल्याचा धोका पत्करून असे हल्ले करायला तुम्ही प्रोत्साहनच देत आहात.'

'तरी हा धोका १९६७ पर्यंतच्या धोक्याच्या मानाने काहीच नाही आणि जर सध्याच्या परिस्थितीला धोका पत्करून राहणे असं तू म्हणत असशील, तर असं सीमेवर धोका पत्करून राहायला माझी शभर टक्के तयारी आहे !'

नाखुमच्या चक्षूंतून पाहिलं तर इस्राइलचं व्याप्त प्रदेशाला चिकटून राहणं असमर्थनीय वाटत नाही. आता असा प्रश्न निघतो की, इस्राइलनं जॉर्डनचा पश्चिम किनारा सोडला नाही, तर पॅलेस्टाइनच्या निराश्रितांचा प्रश्न कसा सुटणार ? आणि सध्या जवळजवळ सर्व जगच म्हणतंय् की, 'Legitimate rights of the Palestinians are the key to the West Asia Problem.' (पॅलेस्टिनियन लोकांचे जन्मसिद्ध हक्क प्रस्थापित होणं हा पश्चिम आशियाचा प्रश्न सुटण्याचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे.)

ह्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी पॅलेस्टाइन व इस्राइलच्या भूमीचा इतिहास बघायला लागेल. त्यातूनच सर्व उपप्रश्नाची व शक्य त्या उपायांची उकल होईल.

सोईसाठी आपण पश्चिम आशिया किंवा मध्यपूर्व या नामाभिधानांनी दर्शविलेला भूप्रदेश 'इस्राइल–भूमी' असा करू.

या भूमीचा इतिहास सुमारे ४००० वर्षांपूर्वी सुरू झाला असं मानण्यात येतं. अब्राहाम, आयझॅक् आणि जेकब या त्रयीचा उल्लेख ज्यूधर्मीयांच्या 'बुक ऑफ् जेनेसिस' या ग्रंथात आलेला आहे. अब्राहामचा काल हा इ. स. पूर्व १७०० वर्षे मानण्यात येतो. या त्रयीची जी जमात तीच पुढे 'इस्राइली' म्हणून ओळखू येऊ लागली. या तिन्ही नावांचे 'इब्राहिम,' 'इसाक' आणि 'याकूब' या मुस्लिम नावांशी असलेले साधर्म्य हा योगायोग नाही. अरब मुसलमान व इस्राइली ज्यू हे दोन्ही एकाच भूमीचे पुत्र असल्याची ती निशाणी आहे. जेकब आणि त्याचे बारा मुलगे याना ज्यूजमात आपले मूळ-पुरुष मानते.

त्यानंतरचा इ. स. पू. १००० पर्यंतचा इतिहास फारसा ज्ञात नाही. राजा मोझेस व त्याचा मुलगा जोशुआ ही दोन नावं ऐकू येतात. इ. स. पू. सुमारे १०१० मध्ये ग्रीक राजानी इस्राइल भूमीवर आक्रमण केलं. त्या वेळी राजा सॉल यानं ग्रीक आक्रमकांना डोंगराळ प्रदेशातून घालवून दिलं. डेव्हिड-गोलिआथ हे पुराणप्रसिद्ध द्वंद्व याच सुमारास घडलं.

त्यानंतरचा महत्त्वाचा ज्यू राजा म्हणजे राजा डेव्हिड (काळ इ. स. पू. १००४–९२८) सध्या इस्राइलच्या झेंड्यावर डेव्हिडचा तारा दिसतो, तोच हा डेव्हिड. ह्याचं राज्य चारशे वर्षं टिकलं. त्यानं जेरुसलेम ही ज्यूंची राजधानी केली. फिलिस्टिन ग्रीकांचा पाडाव करून त्यानं ज्यूंच्या टोळ्यांच्या भूप्रदेशाचं एकत्रीकरण केलं.

डेव्हिडचा मुलगा सॉलोमन (इ. स. पू. ९७०–९३०) याच्या काळात इस्राइल हे मोठे व्यापारी राष्ट्र बनले. सॉलोमनने बरीच नवीन शहरे बांधली. त्यापैकी मेगिडो, गेझर, एट्झिओन या शहराचे अवशेष अद्यापही सापडतात.

सॉलोमननंतर इस्राइली साम्राज्याचे खूप तुकडे पडले. एका भागात दहा टोळ्यांचं राज्य होते. हे राज्य असीरियन राज्यानी इ. स. पू. ७२२ मध्ये नष्ट केले. दुसऱ्या भागात (दक्षिणेत) 'जुदा' नावाचे राज्य इ. स. पू. ५८७ पर्यंत टिकले. त्यावर डेव्हिडचे वंशज राज्य करीत होते. ५८७ साली बॅबिलोनियन लोकांनी हे राज्य आणि ज्यूंना पवित्र असलेले देऊळ नष्ट केले. एवढेच नव्हे, तर सर्व ज्यूंना त्यांनी बॅबिलोनियाला हाकलून दिले.

त्यानंतर इ. स. पू. ५३९ मध्ये पर्शियन राजा सायरस् याने

यानं बॅबिलॉन जिंकून घेतले व ज्यूना परत जेरुसलेमला जाण्याची परवानगी दिली. ५२० साली पवित्र देऊळ परत बाधायला सुरुवात झाली. हजारो ज्यू लोक पुन्हा परत आले. पर्शियन राजांची मालिका (आर्टाक्सेर्क्सेस, नेहेमिया इ.) बरीच वर्षे चालू राहिली.

इ. स. पू. ३३२ मध्ये शिकंदरानं (अॅलेक्झांडर दि ग्रेट) हल्ला करून ही भूमि जिंकून घेतली. ओघानेच हे नमूद केले पाहिजे की, ग्रीक प्रभावामुळे त्यानी 'फिलिस्टिन'वरून इस्राइलचं नाव फिलिस्टाइन् असे ठेवले. त्यावरूनच पुढे 'पॅलेस्टाइन' हे नाव रूढ झालं

शिकंदराच्या मृत्यूनंतर टॉलेमी व सेल्यूकस यांच्यात इस्राइल भूमीवरून वितुष्ट आले. जुदाइया हा प्रांत सेल्युकसच्या वंशजांकडे होता. इस्राइली लोकानी येथे बंड केले आणि इ. स. पू १२८ मध्ये स्वातंत्र्य मिळवले.

त्यानंतरच्या काळात पॉंपीच्या आधिपत्याखालील रोमन फौजांनी इस्त्राइलवर प्रचंड हल्ला करून जेरुसलेम जिंकले. इस्राइली राज्य संपुष्टात आणले आणि रोमनांचा अंकित म्हणून ह्यास्मेनियन वंशाचा ज्यू राजा ह्रिर्कानस याला मर्यादित अधिकार दिले. त्यानंतर हेरॉड नावाचा ह्रिर्कानसच्या सल्लागाराचा मुलगा अधिकारावर आला.

हेरॉडने रोमन सार्वभौमत्व मान्य केले त्याच्या बदल्यात रोमन लोकांनी त्याला राजा म्हणून मान्यता दिली. हेरॉडने बांधलेल्या अनेक सुप्रसिद्ध वास्तू आजही बघायला मिळतात. त्यापैकी प्रमुख म्हणजे मसादा किल्ला, हेरोडिओन किल्ला. हेरॉडचा काल इ. स. पू. ३७ ते ४ हा होय.

हेरॉडच्या मृत्यूनंतर पुन्हा रोमनांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. रोमन सम्राट नीरोच्या काळात ज्यूनी अनेक बंडे केली. ती रोमनानी क्रौर्याने मोडून काढली. इ.स. ७० मध्ये रोमन सरदार टायटसने जेरुसलेमला वेढा देऊन ते नष्ट केले. त्या वेळी जेरुसलेमच्या ३० लाख ज्यू लोकसंख्येपैकी २० लाख लोक या वेढ्यात मृत्युमुखी पडले. हजारोंना गुलाम केले गेले !

त्यानंतर इस. १३२ ते१३५ पुन्हा ज्यूंचे बंड झाले. तेव्हा मात्र रोमनांनी काहीही संदेह न ठेवता हे बंड मोडले. जेरुसलेमवर नांगर फिरवण्यात आला आणि तिथे ज्यूना यायला बंदी करण्यात आली ! त्यानंतर इ. स.१९४८ मध्ये इस्त्राइलची स्थापना होईपर्यंत ज्यूंची जेरुसलेमवरची सत्ता खंडित झाली.

रोमनानंतरही ज्यू लोक आणि ज्यू धर्म यांनी चिकाटीने आपला लढा चालूच ठेवला. युध्दांमुळे आलेले दारिद्र्य सोसूनही खूप ज्यू लोक इस्राइल भूमीतच टिच्चून राहिले. अॅंटोनियस पायसच्या अमदानीत ज्यूना नागरिक म्हणून मान्यता मिळाली. ज्यू राजांची जागा आता धर्मगुरु 'रॅबाय्' नी घेतली. 'रॅबाय' लोकांना आता मोठा मानमरातब मिळाला आणि त्यानी चालू केलेली धार्मिक शिक्षणाची केंद्रे फोफावत चालली.

इ. स. १३५ ते सुमारे ३१३ पर्यंत हे रोमन-ज्यू राज्य चालू होते. त्यानंतर इ. स. ३१९ मध्ये ख्रिश्चन साम्राज्य झाले. त्या वेळी कॉन्स्टनटिवचे राज्य होते. ख्रिश्चन धर्माला असा उजळा मिळाल्यामुळे येशू ख्रिस्ताच्या जीवनातल्या महत्वाच्या जागा म्हणजे बेथलेहेम ( *जन्मठिकाण* ) *आणि जेरुसलेम* ( *क्रूसावर चढवलेली जागा* ) याना फार महत्त्व आले. ख्रिश्चन लोकानी तिथे आपल्या वसाहती केल्या आणि मोठी चर्चेस बाधली. ज्यू लोकांनी ख्रिश्चन धर्म न स्वीकारल्यामुळे ख्रिश्चनांचा त्यांच्यावर राग होता. ज्यूनाही ख्रिश्चन हे 'आक्रमक' वाटत असल्याने त्यांच्याही मनात ख्रिश्चनांबद्दल अढी होती. याचा परिणाम असा झाला की, पर्शियन लोकानी जेव्हा इ. स. ६१४ मध्ये इस्राइलवर हल्ला केला तेव्हा ज्यूनी त्यांचे स्वागतच केले. पर्शियनांनी ज्यूना तीन वर्षे जेरुसलेम बहाल केले; पण लागलीच विचार बदलून परत ख्रिश्चनांकडे ( ज्याना 'बिझनटाइन' म्हणतात ) दिले.

## अरबांचे राज्य

यानंतर इस्राइलवर राज्य करण्याची पाळी आली अरबांची. इ.स. ६३२ *मध्ये* महंमद पैगंबराचा मृत्यु झाल्यावर अरबांनी बिझनटाइन्सचा पराभव केला आणि इस्राइलभूमि आपल्या आधिपत्याखाली आणली. अरबांनी ज्यूंना आणि ख्रिश्चनांना दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून वागवले. जेरुसलेममध्ये जी अलअक्सा मशीद आहे तिथून पैगंबराचे परलोकगमन झाले असे मुस्लिम धर्मीय मानतात.

इ. स. १०९९ मध्ये अरबांकडून ही भूमी क्रुसेडर सम्राटानी जिंकून घेऊन तिच्यावर इ. स. १२९१ पर्यंत सत्ता गाजवली. हे क्रुसेडर लोक म्हणजे मूळ युरोपियन सरदार. *क्रौर्य आणि शौर्य ही* दोनच त्याची विशिष्ट लक्षणे. त्यांच्या अमदानीत ज्यू व मुस्लीम धर्मीयाच्या अनेक कत्तली झाल्या. क्रुसेडरांच्या राजवटीला 'लॅटिन' म्हणत.

इ. स. १२९१ मध्ये इजिप्तच्या मामलुक राजांनी ही भूमी क्रुसेडरांकडून जिंकून घेतली. ही राजवट इ. स. १५१६ पर्यंत चालली. मामलुक राजांनी ख्रिश्चन धर्मीयाच्या मानाने ज्यू जनतेला खूपच चागली वागणूक दिली. विद्वानांना करांत सूट मिळाली.

इ. स. १५१७ पासून तुर्कस्तानच्या ऑटोमान सम्राटांची राजवट सुरू झाली. त्याचा राजा सुलेमान याने मामलुकाकडून इस्राइलभूमी जिंकून घेतली. त्याच्या अमदानीत राज्यकारभारात खूप सुधारणा झाल्या. ज्यूना वागणूक चांगली मिळायला लागली. याचा परिपाक म्हणून युरोपमधून ज्यू लोक इस्राइलला यायला लागले. इ. स. १५५० मध्ये ज्यूची संख्या १०,००० झाली

काळाच्या ओघामध्ये मागासलेल्या तुर्की साम्राज्याचे पाश्चात्य देशांबरोबरचे संबंध वाढू लागले. इंग्लंडची वकिलात जेरुसलेममध्ये इ. स. १८३८ साली सुरू झाली. तिथल्या ज्यू लोकाच्या रक्षणाची जबाबदारी इंग्लंडनं स्वीकारली. इ. स. १८४० नंतर ज्यूंची परिस्थिती खूपच सुधारली. सर्व युरोपहून ज्यूधर्मीय इस्राइलस स्थायिक होण्यासाठी जाऊ लागले. इ. स. १८८० मध्ये जेरुसलेममध्ये ज्यू बहुसंख्य झाले. याच सुमारास ज्यूंच्या राज्याची कल्पना निघाली. इ. स. १८९७ मध्ये पहिली झायोनिस्ट परिषद थिओडोर हर्शलने आयोजित केली. या परिषदेत इस्राइलमध्ये ज्यूचं राष्ट्र स्थापण्याचा इरादा आणि त्याचबरोबर इस्राइलमध्ये अनिर्बंधपणे जाऊ देण्याची मागणी पुढे आली.

पहिल्या महायुद्धात तुर्की साम्राज्य जर्मनीच्या बाजूने लढले यामुळे युद्ध संपताच पराभूत राष्ट्रात ते जमा झाले. इ. स. १९१७

मलपृष्ठ १ वर

कथा

# बेबी सीटर

## सौ. माधुरी बापट

फेब्रुवारी महिना ! बाहेर नुसत्या बर्फाच्या राशी! थोडेफार ख्रिसमस ट्री सोडले तर कुठेही हिरव्या रंगाचा मागमूस नाही. ती झाडही बर्फाच्या भाराने झाकलेली, वाकलेली ! १० ला पोचलेलं टेंपरेचर ! ढगाळ सुन्न हवा ! कुठे चिटपाखरूही नाही. सगळा निसर्गच जसा मृतवत झालाय. बर्फाचा आता मात्र खरंच कंटाळा येऊ लागलाय. अमेरिकेत आल्यावर अगदी पहिला स्नो फॉल पाहताना पिसासारखे हलके, पांढरेशुभ्र स्नोफ्लेक्स अनुभवताना मन कसं थुईथुई नाचल होतं. निसर्गाच्या आश्चर्याचा तो आणखी एक नवा अनुभव होता. लाडक्या देवाला, माणसाला पाढऱ्या शुभ्र फुलाच्या पाकळ्यांचा अभिषेक करावा ना, तसाच ! निसर्गाच्या कुठल्याही आश्चर्यात कधी तोच तोपणा वाटत नाही, नाही का ? इंद्रधनुष्य पाहताना किंवा धरणीकंप अनुभवताना– तो अनुभव शिळा वाटत नाही– दरवेळी नवाच, ताजाच, टवटवीतच !

फक्त पावसाळा नि हा बर्फ याचा मात्र आता मला खूप कंटाळा येतो. अकोल्यात उन्हाळ्याचा कंटाळा येई. तेव्हा इंग्लंड,– अमेरिकेतल्या बर्फाच्या कल्पनेनं, स्किइंगच्या कल्पनेनं मन नुसतं हुरळून जायचं; पण अर्धं आयुष्य उलटल्यावर स्किइंग कसलं करतेस मोहा ! मोहा – सुनिलचं आवडतं नाव ! 'मोहिनी' चा इतका छान शॉर्टफॉर्म कधी कुणी केला नसेल. सुनील माझा लाडका जोडीदार– त्याला किती विशेषणं लावू ? गरीब, सालस, प्रेमळ, कष्टाळू, गुणी – त्याच्यातला अवगुण, अवगुण एकच! डॅबिस नसणं ! ह्या चोरांच्या दुनियेत लागणारा चोरपणा अंगी नसणं !

घरट्यातल्या जोडीदारणीला, लेकराला प्रेमाची ऊब, सुख, संरक्षण द्यायची किती त्याची धडपड ! त्या विचारानंच जीव नुसता कळवळतो मग त्याला ही मनातली खळखळ सांगून आणखी कशाला दुःखी करायचं ? पण गेले आठ दिवस डोक्यात नुसतं विंटरचं ब्लीझर्ड चालू आहे. किती आठवू नये म्हटलं तरी तो प्रसंग नुसता जीव जड करतोय.

त्या वेळी वाटलं होतं, ही धरणी दुभंगून पोटात घेईल तर किती बरं ! पण सीतेसारखी पुण्यवान तीच ! आपण सामान्यांनी नुसते असे दुःखाचे घट उराशी घेऊन सुखाच्या पाठी धावायचं.

आणि नको तेच सारखं आठवतंय. तेव्हापासून मनाचा सगळा बॅलन्सच जातोय. भाजीत मीठ डबल पडतंय तर आमटीत घालायलाच विसरते. स्वेटर विणताना तर सारखे टाके चुकताहेत !

'मोहा, तब्येत बरी नाही का ?' ह्या सुनीलच्या प्रश्नावर काय उत्तर द्यायचं ते कळत नाही.

'छे रे, बरेच दिवसात आई–आप्पांचं पत्र नाही ना आलं, म्हणून मूड नाही लागत आहे इतकंच !' ह्या उत्तरानं त्याचं समाधान होतं, कारण माझी आई-आप्पांशी असलेली स्ट्रॉंग अॅटॅचमेंट त्याला ठाऊक आहे.

पण खरं कारण, तोच त्याला सांगायला मात्र जीभ उचलवत नाही. ते ऐकून तो आणखीनच अर्धा होईल. पण एकटीनं हे सहन करताना मात्र विचारानं डोकंच फुटायची वेळ आलीय. 'खर्ं ऽ खर्ं ऽ' ह्या टेलिफोनच्या घंटेनं एकदम तंद्रीच भंगली.

'हॅलो, मोहिनी !' पलीकडून आवाज.

'येस, स्पीकिंग !'

'इमर्जन्सी सर्जरीमुळं आम्ही दोघं रात्रीपर्यंत अडकलोय. सुप्रिया रात्री दहापर्यंत राहिली तर चालेल ना ? Any problem ?

'छे हो, प्रॉब्लेम कसला ? राहू दे की ! तुम्ही अगदी काळजी नका करू !'

'थॅंक्स !'

'डॉ. अजितचा फोन ! अगदी राजा माणूस ! त्याची सात वर्षांची छोकरी – सुप्रिया– असते माझ्याजवळच दिवसभर ! अजित-उत्तरा दोघंही मोठ्ठे सर्जन ! मुलीकडे पाहायला कुणाला वेळ ? बाकी पोरीनं गुण सगळे बापासारखे उचललेत् ! पण दिसते मात्र थेट आईसारखी ! गुण आईचे उचलले नाहीत ते किती बरं झालं !

सदानकदा ढगात वावरणाऱ्या त्या बुद्धिमान बाईला स्वतःच्या पोरीच्या मनाची, भावनाची मात्र जरादेखील कदर वाटत नाही. त्यामुळंच सुप्रियाला आईपेक्षा अॅंटीचाच ओढा, लळा, जास्त लागलाय्. माझी न् तिची एवढी गट्टी जमलेली तिच्या आईला डॉ. उत्तराबाईंना– मात्र फार खटकते.

आमच्या रोहितबरोबरही माझी एवढी गट्टी नसेल. बाकी रोहित नि सुप्रिया अगदी खूष असतात एकत्र खेळायला भाडायला ! शाळेतून येतात स्कूलबसने ते पण अगदी हातात हात धरून ! एकमेकाला आधार देत. त्या निसरड्या बर्फातून घसरायला बाकी फार होतं. पहिली-दुसरीत शिकणाऱ्या ह्या पाखरांना आहे का कसली जगाची, भविष्याची काळजी ? लहानपण कसं छान असतं नाही ?

लहानपण--माझं लहानपण ! सुखाच्या, सुरक्षितेच्या गाद्यागिरद्यांवर लोळतच मी वाढले.

अकोल्याच्या आमच्या वाड्यात मी पारिजातकाची नाजुक फुलं परकराच्या ओटघात गोळा करत असे तर पारिजातकाच्या बियाच सुनील पैसे म्हणून मुठी भरभरून गोळा करीत असे. पारिजातकाची फुलं ती काय– लगेच कोमेजून जायची; माणसाच्या स्पर्शानं तर फारच लौकर ! पण त्याचे पर्यवसान माझ्या ओकसाबोक्शी रडण्यात व्हायचे. माझ्या रडण्याने कावराबावरा झालेला सुनील म्हणायचा, 'रडू नकोस. मोठेपणी असेच खूप पैसे मिळवून मी तुला सुखात ठेवणारे !' त्याच्या ह्या वाक्यावर मात्र आपण खो खो करून हसत सुटायचो.

पण तो प्रसंग आता आठवला की मात्र सुनील नुसता कोलमडून जातो. 'मोहा, तुला

पैशाच्या राशीवर बसलेली मला पहायचीय' पण त्याचं हे स्वप्न पुरं करायला देव अगदी परीक्षाच घेत आलाय. लहानपणी मात्र पारिजातकाच्या पैशांची रास करणं किती सोपं असतं नाही ?

मुलाच्या आवाजानं केवढी दचकले! फोनच्या आवाजानं दोघं उठतील असं वाटलंच होत. दुपारची नॅप घेऊन लागली परत दोघं खेळायला ! दोघाच्या स्नॅकसची तयारी करायला हवी. दोन मुलं पण चार तऱ्हा ! सुप्रियाला द्राक्षाचं कूलएड हवं तर रोहितला कोक ! पोटॅटो चिप्स् मात्र दोघानाही प्रीय ! रोहित-सुप्रिया– हाका मारायला तोड उघडते तो दोघं आली धावतच.

'ममा, आम्ही स्नो मॅन करायला बाहेर जातो ना !' रोहितचा हट्ट !

'आँटी, आज नाही किनी बाहेर पडायचं ? डॅडीनी मला बजावलंय. बाहेर पडलं तर न्यूमोनिया होईल. खरं किनी आँटी ?' सुप्रियाचं समजावणं.

'हॅट, न्यूमोनियाला काय भितेस ! मी देईन औषध, मोठ्ठा डॉक्टर होणारे मी !' रोहितच्या फुशारक्या.

'अहा रे,आत्ता तर सेकंड ग्रेडमध्येच आहे. तुला डॉक्टर व्हायला अजून २० वर्षं हवीत. कालच नाही का टी.व्ही.वर 'सेसमी स्ट्रीट' मध्ये अर्नीने बर्टला सांगितलं. डॉक्टर *व्हायला तेवीस वर्षं शिकावं लागतं. आठ वर्षं* प्रायमरीची, चार वर्षं हायस्कूलची, चार वर्षं कॉलेजची, चार वर्षं मेडिकलची, दोन वर्षं रेसिडेन्सीची आणि एक वर्ष इंटरनशिपचं !' सुप्रियाची लांबड कधी संपते असं झालं.

'अग हो हो, सुप्रिया, आणि रोहित अजून एक दोन आठवड्यानी थोडं वॉर्म झालं की मग स्नोमॅन करायला जायचं ! आत्ता घरातच खेळा. आधि तुमचं कुलएड पिऊन घ्या; स्नॅकस घ्या. नि ते लिंकन लॉग्स्च घर बाधत बसा बरं. चार वाजले की सेसमी स्ट्रीट पहा टी. व्ही. वर ! ओ. के. ?

सुप्रिया विजयी चेहऱ्यानं नि रोहित काहीसा रुसूनच पण जोडी एकदाची त्याच्या खोलीत पळाली !

एवढ्या गोंधळात लोकरीचा झालेला गुता सोडवता सोडवता मात्र माझ्या डोक्यातलं विचाराचं ब्लीझर्ड दुप्पट वेगानं घोंघावू लागलं.

ह्या मुलाचा बर्फात खेळायचा, बर्फाचा माणूस बनवायचा हट्ट– सगळ्यांचे लहानपणचे हट्ट सारखेच. फक्त काळ नि साधने निराळी लहानपणी बागेतल्या मातीचा चिखल करून त्याची बोळकी बनवायचे आपले खेळ ! त्यावर आप्पा किती रागवायचे. मग आपल्यावर लक्ष ठेवणाऱ्या गजराला तो चिखल साफ करता करता पुरेवाट होई.

काय नियतीचा खेळ असतो पहा ! पंचवीस वर्षांपूर्वी अकोल्याच्या आप्पासाहेब भडकमकराच्या लहानग्या ताईसाबावर लक्ष ठेवायला, सांभाळायला, फिरवायला, दोन-दोन बाया असत. नि त्याच ताईसाव आता अमेरिकेत लोकाची मुलं साभाळताहेत वा ! फक्त जॉबला नाव जरा निराळं, आधुनिक, गोडस मिळालय्.–बेबीसीटर !

खरं तर मला नि सुनिलला–दोघांनाही मुलांची खूपच आवड ! हौस ! भारतात असतो तर एव्हाना आणखी एकदोन तरी सहज झाली असती; पण इथं ते कसं शक्य *आहे ? डिलिव्हरीलाच तीनएक हजार डॉलर्स* बाजूला ठेवायला हवेत. त्यानंतर लहान मुलाचं औषधपाणी ! म्हणजे ब्रह्मांड आठवतं. अंगात तीन तीन ताप असला तरी त्या लहानग्या जिवाला दुलईत गुंडाळून डॉक्टरकडे जावं लागतं. इथं घरी कोण यायला *बसलंय ? ही काय इंडिया आहे ?* आपल्या लहानपणी नि रोहितलाही घरी येऊन तपासणारे आपले अकोल्याचे साने डॉक्टर आता अगदी देवासारखे वाटतात !

शिवाय दुसरं मूल झालं की अपार्टमेंट पण बदलायला हवं. तीन बेडरूमचं अपार्टमेंट म्हणजे त्याचं भाडंही भरमसाट ! हा खर्च कसा झेपेल ?

असे विचार आले की मनाला खरोखर लाज वाटते. आपल्या तिकडची लोकं खरंच किती सुखी असतात ! मुलं म्हणजे खर्च, कटकटी, प्रगतीतली धोंड असे विचारही तिथं मनाला शिवत नाहीत. *देवाकडनं आलेला जीव*, त्याची देवाला काळजी ! हा विचारं इथं मात्र मूर्खपणाचा ठरतोय्. नि ते खोटं का आहे ?

पण मी मात्र सुप्रियालाच माया लावून दुसऱ्या मुलाची हौस भागवतेय्.

'आँटी,' सेसमी स्ट्रीट '*दे ना लावून*' सुप्रियाच्या वाक्याने दचकले केवढी ! पण ती पोरं मजेत टी. व्ही. बघण्यात बघता बघता रंगून गेली. समोर ठेवलेले पॉपकॉर्न *खाण्याचंही भान नाही दोघाना !*

आपल्या लहानपणी कुठं टी. व्ही. होता ? पण खेळायला भलं मोठं अंगण होतं नि डझनभर खेळगडी होते. टिपरीपासून भोंडल्यापर्यंत सगळे खेळ होते.

पण इथं ह्या जीवघेण्या थंडीत ह्या मुलांना सेसमी स्ट्रीटमधली अर्नी, बर्ट, बिग बर्ड, कूकी मॉन्स्टर ही मपेट्सच खेळगड्यांहून जास्त प्रीय झालीत्.

ह्या कल्पनेच्या कठपुतळ्या करून माणूस कसा आपली करमणूक करून घेतो; पण हीं मपेट्सची कल्पनासुद्धा माणसांवरूनच सुचली नाही का ? त्या बर्टसारख्या आपणही स्वभावाने गरीब, हळव्या आहोत नि त्या अर्नीसारखीच उत्तरेची स्वभावप्रकृती. दुसऱ्याचे वीक पॉइंट्स् हेरून, त्यावर हल्ला करून, त्याची चीरफाड करून, हॅरॅस करून आसुरी आनंद उपभोगायचा !

जगात जशी मोहासारखी माणसं आहेत तशीच उत्तरेसारखी असणारच ! हे मनाला कळतं पण वळत नाही; देवमात्र मोहा-उत्तरासारखी मपेट्स नाचवून आपली करमणूक करून घेतोय्.

निसर्गसुद्धा कडाक्याच्या थंडीत, बर्फात माणसांची होणारी फजिती पाहून हसतोच. एवढ्या थंडीतसुद्धा साध्या दुधासाठी चार-दोन मैलांची रपेट करावी लागते कधी-कधी ! परवा चुकून हातमोजा पडला तर ब्रह्मांड आठवलं. थंडीनं काळानिळा होऊन वाकडचा झालेल्या हाताचं अर्धाएक तास सेन्सेशनच गेलं. अशी आपली तऱ्हा !

पण सुनिल तर चौदा चौदा तास रात्रीचासुद्धा थंडीनं काकडत गॅसस्टेशनवर लोकांच्या कार्समधून पेट्रोल भरत असतो. ह्या बेकारीच्या, महागाईच्या काळात आपल्यासारख्या माणसानी तग धरून राहायचं म्हणजे नको जीव झालाय्. महिन्यापूर्वी एका शुक्रवारी अचानक ले ऑफ दिला म्हणून घरी आला– तेव्हाचा त्याचा भकास चेहरा पाहवेना. माझ्या तर पोटात खड्डाच पडला ! दोन दिवसात एकदम दहा वर्षांनं म्हातारा झाल्यासारखा वाटला तो !

सगळीकडेच ले ऑफ देताहेत. एवढ्या

थंडीत घरं गरम ठेवतील की फॅक्टऱ्या चालवतील ? नोकरी तर कुठेच मिळायची चिन्हं नाहीत !

तरी आपला तसा काही आग्रह नाही त्या जोशासारखा, अगदी इथेच ह्या फिलाडेल्फियातच नोकरी हवी असा! कुठेही जायची आपली तयारी आहे. खरं म्हणज ह्या फिलाडेल्फियाचाच आता अगदी कंटाळा आलाय्. गेल्या आठ दिवसापासून तर फारच ! इथे येणाऱ्या मराठी माणसानी किनी गावांचं अमेरिकेतलं पुणंच करून टाकलंय्. ऐतिहासिक महत्त्व, शिक्षणाचं माहेरघर सर्वच बाबतीत असं दोन्ही गावात साम्य ! पण एकदा पुण्यात राहिलेली माणसं जशी जीव गेला तरी पुणं सोडायला तयार नसतात तसंच. नोकरी गेल्यावर अनएम्प्लॉयमेंट अलौस घेतील, फुडस्टँप्सही घेतील; पण हे गाव सोडून काही दुसऱ्या ठिकाणी जायची नाहीत ! खच्चून भरलेली मराठी माणसं, मराठी मंडळं, सण, उत्सव, नाटकं, सिनेमे, लग्नं ह्यानी तर कधीकधी आपण पुण्यातच आहो असं वाटलं.

तशात ती भाषणं, पैशावरून, मानावरून एकमेकांच्या कुचाळक्या, टिंगल, टवाळी ! ही काय सुशिक्षित सुसंस्कृतपणाची लक्षणं झाली ? इथं राहूनही ही माणसं अशीच राहिली तर–तर आपली खेडवळ माणसं काय वाईट ? त्यांच्या हृदयात तरी प्रेमाचा, मायेचा झरा असतो. ह्याच्यासारखं दिखाऊ प्रेम नाही, नाटकीपणा तरी नाही !

नाटकीपणा–नाटक हे शब्दच आता विखारासारखे वाटतात कानाला, सुरीसारखे घुसतात हृदयात ! त्या दिवशीच्या मराठी मंडळातलं ते नाटक ! सुनीलच्या ले ऑफमुळं खरं म्हणजे जायचा मूडच नव्हता; पण तिकिटंच आधी काढून ठेवली होती म्हणून अगदी नाइलाज झाला; पण त्याची आठवणही आता नकोशी होतेय. त्या प्रसगाची आठवण गेले आठ दिवस जीव नुसता खात आहे. खरं तर मला नि सुनिलला नाटकाची किती आवड ! मनपसंत साडी नेसून, मोगरा माळून एक रात्र वेगळ्याच जगात घालवायची. त्यासारखी सुखाची, चैनीची आपली कल्पना नाही दुसरी !

पण आता तीच नाटकं आयुष्यातली वैरी बनली आहेत माझ्या ! त्या प्रसंगाची आठवण जरी झाली तरी माझं ब्लडप्रेशर वाढतय्. एक बरं झालं, त्या वेळी सुनील तिथ नव्हता. नेमका रोहितला घेऊन रेस्टरूममध्ये गेला होता.

कशो कोण जाणे पण उत्तराची नी माझी जागा जवळ जवळ आली. अजित तिला समजावत होता. गरीब बिचारा ! पण उत्तराच्या फटकन् उच्चारलेल्या वाक्यानं माझ मात्र काळीज कापून गेलं.

'छे ! मी नाही हो बेबीसीटर जवळ बसायची ! मला माझ्या पोझिशनप्रमाणे पुढच्याच रांगेतली जागा हवी !' वर्षाला ऐंशी हजार डॉलर्स कमावणाऱ्या त्या कर्तृत्ववान, बुद्धिमान सर्जन बाईच्या वाक्याने मी मात्र पुरती खलास झाले ! आसपासच्या लोकांच्या कुणाच्या कुत्सित तर कुणाच्या करुण नजरानी मी अगदी अर्धमेली झाले. वाटलं त्याच वेळी धरणी दुभंगून पोटात घेईल तर !

पण सगळेच अपमान पोटात घेऊन जगण्याचं देवानं आपल्यावर टाकलंय्. फणकाऱ्यात निघून गेलेल्या उत्तरेकडे पाहात सुनील विचारत होता, 'का ग ? काय झालं ?' त्याचा प्रश्नही नीट कळला नव्हता मला ! पण कशीबशी उत्तरले की 'तिला हॉस्पिटलमधून इमर्जन्सी कॉल आलाय्.'

नंतरचं सगळं नाटक कसं पार पडलं ते काहीच कळलं नाही नि सुनिललाही माझ्या अचानपणे डोकं दुखू लागलेल्याचं कारण समजलं नाही. अॅस्पिरिनवर अॅस्पिरिन घेऊनही गेले आठ दिवस ते ठणकतच आहे. नि विचार करून करून आता मेंदूच्याही चिंध्या व्हायची वेळ आलीय् !

देवाचे फासे कसे पडतात पहा ! कोकणात साध्या भिक्षुकाच्या घरात जन्माला आलेली ही चटकचादणी इथल्या श्रीमंतीवर केवढ्या फुशारक्या मारते आहे नि जमीनदाराच्या घरात जन्मलेली मोह्या जणु इथे तिच्या नोकराच्या भावनेने वागतेय्.

सुनीलच्या इच्छेखातर आपण अमेरिकेत आलो. कौतुकाबरोबरच लाडकी लेक दूरदेशी असल्याने आईआप्पाना काळजी नी दुःख वाटतं. त्यातच इथलं आपलं वर्णन कशाला कळवायचं ? टी. व्ही. पाहाण्यात, कारमधून फिरण्यात, लेक मजा करते आहे ही सुखाची, आनंदाची कल्पना कशाला डागाळायची ?

आणि नोकरालाही मानाने वागवणाऱ्या जमीनदाराला ह्या गोष्टी कळणार कशा ? हट्टाने गजराला आपला भात भरवणारी मोह्या, मळघात गड्याजवळ बसून त्याच्यासारखीच कोरडी चटणीभाकर खाणारे आप्पा नि गरीब आश्रिताच्या बुद्धिवान्, सद्गुणी मुलाला आपला जावई करून घ्यायचा हट्ट धरणारी आई–अशी माणसं ह्या जगातून–ह्या काळातून आता Out dated झालीयेत्.

ती जुनी माणसं अशिक्षित असली तरी त्याच्यात सुसंस्कृतपणा खरोखरच जिवंत आहे; पण इथं मात्र मास्टर्स, डॉक्टर्स डिग्रीहोल्डर्समधून कल्चरल व्हॅल्यू रसातळालाच चाललीय्.

एकीकडे ह्या जगात मुलाना शाळेत मारायचे की नाही ? मारले तर किती ? त्यासाठी आई-वडिलांची परवानगी हवी का ? त्याने काही उपयोग होतो का ? यावर शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ नुसता शब्दाचा, मेंदूचा चुरा करत असतात.

तर दुसरीकडे Child abuse सारखे कायदे असूनही उत्तरेसारखी सुशिक्षित बाई मुलीला अंग सुजेपर्यंत मारते ! हे कोडं–गणित सुटतच नाही, उलगडतच नाही !

हूं ! सुमित्राला उत्तरेनं मारलं हे सागूनही खरं वाटलं नसतं; पण तसं घडलं मात्र ! नि त्याचं कारणही आमच्याच घरात घडलं ही आणखी वाईट गोष्ट !

कधी नव्हे ते अजित-उत्तरा बसली होती पाच मिनिटं बोलत ! सुप्रियाला सोडायला न्यायला बहुधा अजितच वर येतो. उत्तरा असते खालीच कारमध्ये; पण बडबड्या अजितला आमच्या रोहितचा जरा लळाच लागलाय्.

'काय रोहित, मोठेपणी कोण होणार तू ?'

अशा गंमतीने विचारलेल्या अजितच्या प्रश्नाला मोठ्या ऐटीने रोहितने उत्तर दिले होते—

'ऑफकोर्स, अंकल ! तुमच्यासारखा मोठ्ठा सर्जन ! पण गरीबाकडून औषधाचे पैसे नाही घेणार नि लहान मुलाना तपासायला त्याच्या घरी जाणार !'

यावर उत्तरा फिसकन हसली होती, पण 'डॅडी' मी मात्र मोठेपणी आँटीसारखी बेबीसीटरच होणार ! बेबीसीटर छान असते,

छान बोलते, लाड करते, मुलांच्यात खेळते.'

सुप्रियाचं हे वक्तव्य ऐकून मात्र उत्तरेचा चेहरा संतापाने नुसता फुलून गेला. 'चला उशीर होतोय्!' म्हणून कंपनी एकदाची बाहेर पडली.

पण दुसऱ्याच दिवशी माझ्या गळचात पडून ओक्साबोक्शी रडत आईनं कसं मारलं याची कहाणी, सुप्रिया मला सांगत होती.

बाबांचंसुद्धा न ऐकणाऱ्या तिच्या आईची ही कहाणी मी मात्र मनातच ठेवून आहे. ती सुनीलला सांगून त्याच्या हळव्या मनावर दुःखाचा आणखी एक चटका द्यावासा वाटत नाही.

जांभळ्या लोकरीचा गुंडाच संपला तसं उठावंच लागलं. टी. व्ही. बंद करून मुलांनी रेडिओ लावला होता नि 'Snow blizard expected, Driving conditions hazardous, stay at home' ह्या wheather forecast ने कॅन्सासला इंटरव्ह्यूसाठी गेलेल्या सुनीलची जास्तच काळजी वाटू लागली.

मुलांचं 'शुभं करोति' सुरू झालं होतं, तशी मनाला थोडी उभारी वाटली. टेबलावर पानं मांडते आहे एवढ्यात फोन खणखणलाच. पलीकडून सुनिलचा आवाज ऐकून हुश: झालं. 'मोठ्ठा जॉब मिळाला! पे मस्त! रात्रीच्या फ्लाइटने येतो. तुला बेबी सीटिंग करायला नको...'

त्याची वाक्यं कानावर नुसती आदळत होती. एकीकडे जीवघेणा विंटर संपून स्प्रिंगच्या चाहुलीनं मन हुरहुरलं नि एकीकडे बेबीसीटरचं अपमानित मन, अनुभव खोल हृदयात लपून बसत होता आणि माझ्या कापऱ्या झालेल्या आवाजाचं कारण मी सुनिलला सांगू शकत नव्हते. रेडिओवर करुण स्वरात माझ्यासारखीच कोणी तरी गात होती.

'...I can't tell you, Why ?'

□

# पुस्तके

राजा दीक्षित

## दत्तो वामन पोतदारांचा 'शिवाजी'

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचं शिवचरित्र म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातला एक धमाल विनोदच ठरला. कोणे एके काळी यशवंतराव चव्हाणांच्या आग्रहावरून पोतदारांनी शिवचरित्र लिहिण्याचे मान्य केले, पण पोतदारांची एकूण स्वभावप्रकृती आणि त्यांच्यामागील असंख्य संस्थांचा व्याप लक्षात घेता त्यांच्या हातून शिवचरित्र पूर्ण होणे कठीणच होते. तरीही 'मी शिवचरित्र लिहिणार!' असे पोतदार ठणकावून सांगत असत आणि त्यावर विश्वास ठेवून लोक त्या शिवचरित्राची चातकासारखी वाट पहात बसत. वर्षामागून वर्षे मागे पडत होती, तरी पोतदारांचे शिवचरित्र काही केल्या पूर्ण (खरं म्हणजे सुरूच) होत नव्हते. लोकांच्या विनोदाला एक छान खाद्य मात्र मिळत होते. कुठे तरी पाहिलेलं एक व्यंगचित्र मला आठवतंय्. त्यात शिवचरित्र लिहीत बसलेल्या पोतदारांपुढे साक्षात् शिवाजीच अवतरतो आणि म्हणतो,

"आणा इकडे, मीच लिहितो ते शिवचरित्र!"

दुसरा एक मजेशीर किस्साही चांगला लक्षात आहे. 'ललित' च्या १९७६ च्या दिवाळी अंकात माधव गडकरींचा एक लेख आहे. त्यात त्यांनी तो 'ऐकीव' किस्सा दिलाय. त्यावरून पोतदार आणि न. र. फाटक यांच्या दोघांच्याही स्वभावांचं आणि बोलण्याचं उत्तम दर्शन घडतं. तो किस्सा असा–

एकदा एकाने पोतदारांना विचारले,

'शिवचरित्र तुम्ही केव्हा लिहिणार ?'

पोतदार उत्तरले, 'अहो, इथं कुले खाजवायला वेळ नाही आणि शिवचरित्र केव्हा लिहिणार ?'

ही प्रश्नोत्तरी न. र. फाटक यांच्या कानांवर गेली. ते म्हणाले, 'माझी पोतदारांची भेट होऊ द्या. मी त्यांना बरोबर उत्तर देतो!'

आणि एकदा या दोन महान इतिहासकारांची भेट झाली. बहुतेक ती रायगडावरच असावी.

न. र. फाटक म्हणाले, 'पोतदार, शिवचरित्र केव्हा लिहिणार ?'

पोतदारांनी तेच जुने उत्तर दिले.

फाटक : 'तुम्ही असे करा– एक बाई ठेवा!'

पोतदार : 'ती बाई काय शिवचरित्र लिहील ?'

फाटक : 'नाही, नाही. ती बाई कुले खाजवील आणि तुम्ही शिवचरित्र लिहा!'

तेव्हा असा दिवाळी अंकातला एखादा लेख असो, एखादे व्यंगचित्र असो, 'मॅजेस्टिक' च्या गच्चीवरील साहित्यिक गप्पा असोत, 'विच्छा' मधल्या (तेव्हाच्या) दादा कोंडक्यांच्या मार्मिक कॉमेंटस् असोत, विधानसभेतली प्रश्नोत्तरे असोत–सर्वत्र पोतदारांच्या शिवचरित्रावर विनोद होत गेले. एकीकडे ते विनोद ऐकत, दुसरीकडे पुन्हा आपले जुने आश्वासन पोतदार देतच गेले आणि अखेर ६ ऑक्टोबर १९७९ या दिवशी पोतदार शिवचरित्र न लिहिताच

जगाचा निरोप घेऊन गेले !

शिवाजीची चरित्रे अनेकानी लिहिली आणि अनेकजण लिहितील, मग या सगळयात पोतदाराच्याही एका शिवचरित्राची गरज होती का ? लोकानी त्याच्या शिवचरित्राचा एवढा ध्यास घ्यायचाच कशासाठी ? त्याचे शिवचरित्र राहून गेले यात बिघडले काय ?–असे प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांचे माझ्या दृष्टीने उत्तर असे की, पोतदारांच्या शिवचरित्राची खरोखर आवश्यकता होती. ते लिहिले जाणे जवळजवळ अशक्य होते खरे; पण जर यदाकदाचित ते लिहीले गेले असते तर मराठी भाषेतल्या इतिहासविषयक लेखनातला तो एक मौलिक ग्रंथ ठरला असता. मनात आणले असते तर पोतदाराना शिवचरित्र लिहिणे अवघड असले, तरी अशक्य नव्हते. पोतदार नुसते बोलत राहिले, त्यांनी लेखन अजिबात केले नाही असा एक रूढ गैरसमज आहे. पण नाही म्हणता म्हणता पोतदारांच्या नावावर मराठी गद्याचा इंग्रजी अवतार '(१९२२), मराठी इतिहास आणि इतिहास संशोधन'(१९३५), 'महाराष्ट्र साहित्यपरिषदेचा इतिहास' (१९४३), 'सुमनसप्तक' (१९५०),'मी युरोपात काय पाहिले ?' (१९५६), 'श्रोते हो' (१९५९), 'ओळख'(१९६१),' भारतीय भाषासमस्या' (१९६२), 'इनसाईड महाराष्ट्र' (१९६४) आणि 'लो. टिळकाचे सागाती' (१९७५) अशी दहा पुस्तके जमा आहेत. याव्यतिरिक्त अनेक लेख, टिपणे, परीक्षणे, प्रस्तावना वगैरे आहेतच. त्याच्या लेखाची संख्या पाचशेच्या आत नाही. तेव्हा लिहिण्यापेक्षा बोलण्याकडेच कल जास्त असला तरी लिखाणाशी पोतदाराचे अगदीच वाकडे होते असे मानण्याचे कारण नाही. म्हणूनच त्यांनी शिवचरित्र लिहिले नाही याची हळहळ वाटते !

हे शिवचरित्र आवश्यक होते असे मी म्हणतो ते दोन अर्थांनी–

## इतिहास–एक कलाही

एक तर शिवाजीवर कितीही लिहिले गेले तरी पोतदाराचे लिखाण त्यात वेगळेपणामुळे उठून दिसले असते. 'पोतदाराचा शिवाजी' हा इतर 'शिवाजी'पेक्षा खूपच वेगळा दिसला असता ! काहीना माझे हे विधान विचित्र वाटेल. वास्तविक शिवाजी हा एकच. त्याचे रंगरूप एकच. त्याच्या आयुष्यातल्या घटना त्याच आणि त्याच्या चरित्राच्या अभ्यासाची साधनेही सर्वसाधारणपणे तीच. मग ही वेगवेगळया शिवाजीची काय भानगड आहे ? –तर, तशी भानगड वगैरे काही नाही ! तुकारामांच्या कीर्तनाच्या वेळेला शत्रूंना सगळीकडे शिवाजीच शिवाजी दिसू लागलं, या आख्यायिकेवर माझा विश्वास नाही किंवा त्यांतल्या शत्रूप्रमाणे माझी अवस्थाही झालेली नाही ! इतिहास हा मर्यादित अर्थाने का होईना एक कला आहे असे मी मानतो. साहजिकच इतिहासकार हा एका अर्थी कलाकार असतो. कलाकाराप्रमाणेच इतिहासकारातही प्रतिभा आणि सर्जनशीलता असावीच लागते. इतिहासकाराने लिहिलेला इतिहास हा निश्चितपणे एक कलाकृतीच असते. 'प्रेम' या एकाच विषयावर चार कथाकारानी लिहिलेल्या कथा किंवा चार कवीनी एकाच छंदात केलेल्या कविता पूर्णपणे वेगळया असतात. एकाच विषयावर त्या ठराविक रंगाच्या साहाय्याने चार चित्रकारानी काढलेली चित्रं पूर्णतः वेगवेगळी असतील. तसेच इतिहासकारांचे आहे ! तोच विषय, त्याच घटना आणि तीच अभ्याससाधने वापरून वेगवेगळे इतिहासकार जेव्हा इतिहास लिहितात तेव्हा त्या प्रत्येक इतिहासाला स्वतःचे असे वेगळेपण असते. याचे कारण विषय आणि साधने तीच असली तरी इतिहासकारांनी केलेली त्याची मांडणी आणि त्यावरील भाष्य ह्यात प्रचंड फरक पडू शकतो, म्हणूनच शिवाजीचे रंगरूप तेच असले, त्याच्या आयुष्यातल्या घटना त्याच असल्या आणि लेखनासाठी वापरलेली अभ्याससाधनेही समान असली तरी प्रत्येक इतिहासकाराचा शिवाजी आपले असे वेगळे व्यक्तिमत्त्व घेऊन उभा राहतो आणि राहील. बरेच समान धागे असूनही हे सर्व शिवाजी वेगवेगळे असतात आणि असतील. जदुनाथ सरकाराचा शिवाजी, रियासतकारांचा शिवाजी, सेतुमाधवराव पगडीचा शिवाजी आणि दत्तो वामनांचा शिवाजी वेगवेगळाच असणार ! बाळशास्त्री हरदास, बाबासाहेब पुरंदरे आणि पु. ना. ओक याचे शिवाजी त्याहूनही भिन्न दिसतील. डॉ. पंढरीनाथ रानड्यांचा शिवाजी या सर्व शिवाजीपेक्षा वेगळा दिसेल ! तेव्हा एकाच शिवाजीच्या वेगवेगळया चित्रामध्ये पोतदारांनी रंगवलेले चित्र वेगळे दिसले असते. ते नुसते वेगळेच नव्हे तर अत्यंत महत्त्वाचे ठरले असते ! कारण इतिहासाच्या क्षेत्रात पोतदाराचे स्थान फार मोठे होते. १९५८ मध्ये दिल्लीला झालेल्या इंडियन हिस्ट्री कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. इतिहासचार्य रानड्याचे शिष्य असलेले पोतदार 'पुण्याचे पेशवे' या आदरार्थी संबोधनाने ओळखले जात असत. या दोन गोष्टीवरूनही त्याचा इतिहासक्षेत्रात असणारा दबदबा लक्षात येतो. पोतदारांची चतुरस्त्र विद्वत्ता वादातीत होती. आचार्य अत्र्यानी पोतदारांवर एकदाही टीकास्त्र चालवले नाही, उलट 'पुण्याचा तेजस्वी ब्राह्मण' हा सुरेख लेख लिहिला, यात काय ते आलं ! तेव्हा पोतदारासारख्या अधिकारी व्यक्तीचे शिवचरित्र हे फार मोलाचे ठरले असते; पण शेजवलकराप्रमाणेच पोतदाराचेही शिवचरित्र राहून गेले ! –'महाराष्ट्राला मिळालेला हा एक शापच आहे,' असं पगडी म्हणतात ते अगदी खरं आहे !

पोतदाराच्या शिवचरित्राची उणीव मला दुसऱ्या एका संदर्भात फार जाणवते. पोतदाराजवळ नुसती विद्वत्ता नव्हती, तर इतिहासलेखनाला आवश्यक असलेली एक प्रकारची तटस्थता आणि चिकित्सक वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्या वस्तुनिष्ठ लिखाणाला एक वेगळेच वजन प्राप्त झाले असते. शिवाजीवर लिहिताना मराठी माणसे फार वाहवून जाताना दिसतात. व्यक्तिपूजा आमच्या रक्तातच भिनलीय ! शिवाजीचं आम्ही दैवतीकरण करून टाकलंय. आमची ही नाडी ओळखून तर इंदिरा गांधी रायगडावर मध्यंतरी झालेल्या शिवपुण्यतिथीला उपस्थित राहिल्या. त्यानी एक फडमारू भाषण ठोकलं. आमचे राजकारणी हल्ली शिवाजीला सेक्युलॅरिझम चिकटवत असतात. इंदिराबाई त्याच्याही पुढे गेल्या ! 'हे विश्वचि माझे घर' ही शिवाजीमहाराजाची दृष्टी होती असे त्यानी सांगितले. त्यातून अडखळत का होईना ती काव्यपंक्ती त्यांनी 'मराठीत' वाचली ! मग काय विचारता ? तेथे जमलेल्या असंख्य शिवभक्तानी टाळ्याचा पाऊस पाडला! धन्य ते शिवभक्त आणि धन्य ते हुषार राजकारणी! तेव्हा, हे असं आहे ! आमच्या आंधळया भक्तीच्या हजारो कावडी भरून आम्ही शिवाजीला अभिषेक करत असतो ! डॉ. पंढरीनाथ

रानड्यांसारखा एखादा या लाटेविरुद्ध पोहायला लागला तर आम्हाला ते सहन होत नाही.

शिवाजीच्या संदर्भात मोठ्या इतिहासकराच्या लिखाणातही काही घोटाळे कसे होऊन जातात याचं एक उदाहरण पाहाण्यासारखं आहे. प्रा. ग. ह. खरे यानी 'लोकराज्य'च्या एप्रिल १९८० च्या अंकात 'शिवरायदर्शन' हा एक चांगला लेख लिहिलाय. प्रा. खरे हे सुद्धा पोतदारांप्रमाणेच एक आदरणीय ज्ञानवृद्ध आहेत; पण ते सुद्धा आपल्या लेखात एके ठिकाणी शिवाजीबद्दल काय लिहितात पाहा—

'ज्याला सर्व गुणाचा मेरुमणी म्हणता येईल असा त्यांचा गुण म्हणजे परमेश्वरावरील त्यांचा अढळ विश्वास!'

—आता, यावर काय बोलणार? जिथे ग. ह. खऱ्यासारखे इतिहासकार असं लिहून जातात, तिथे इतराची कथा ती काय?

या सगळ्या पार्श्वभूमीवर पोतदाराच्या शिवचरित्राची फार आवश्यकता होती. कुठलीही छापडं न लावता त्यांनी वस्तुनिष्ठ लिखाण केलं असतं. आधळी भक्ती किंवा आधळा आकस त्यानी ठेवला नसता. 'भारतीय इतिहासलेखन–शास्त्रात पोतदाराच्या इतिहास–लेखनतंत्राचा स्वतंत्रपणे समावेश करावा लागेल!'- अशा आशयाचे उद्‌गार सेतुमाधव पगडी यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यान-मालेत यंदा काढले. या उद्‌गारांमध्ये फार मोठा अर्थ सामावलेला आहे.

पोतदाराचे शिवचरित्र वाचकाच्या हातात पडले नाही, तरी त्यांची दुधाची तहान निदान ताकावर भागावण्याइतकी तरी व्यवस्था झालीय. पोतदारांच्या शिवाजीविषयक लेखनाचे संकलन करून 'श्रीशिवचरित्राचे पैलू' या नावाने ते प्रसिद्ध करण्यात आले आहे. 'केसरी प्रकाशना'च्या या पुस्तकाच्या संपादिका आहेत. डॉ. कमल गोखले. हे पुस्तक पोतदाराच्या शिवचरित्राची थोडीशी झलक दाखवून जातं. त्यामुळे या पुस्तकाची ओळख करून देणं आणि थोडी चिकित्सा करणं मला आवश्यक वाटतं.

## जागतिक/भारतीय पार्श्वभूमी

'श्रीशिवचरित्राचे पैलू' ह्या पुस्तकाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे, मी आधी म्हटल्याप्रमाणे, त्यावरून पोतदारांच्या शिव-चरित्राची थोडी झलक कळू शकते. या पुस्तकात पोतदाराचे शिवाजी-विषयक एकूण १७ लेख, मुलाखती, भाषणे वा टिपणे दिलेली आहेत. 'संकल्पित चरित्राची रूपरेषा' हे पहिले प्रकरण संपादिकेने लिहिलेले आहे. पोतदारांशी पूर्वी झालेल्या गप्पामध्ये पोतदार शिवचरित्राबद्दल जे बोलत, ते आठवून संपादिकेने पोतदाराच्या शिवचरित्राची रूपरेषा लिहिली आहे. गप्पाची स्मृती हा लेखनाधार लक्षात घेता ही रूपरेषा संपूर्ण विश्वसनीय (authentic) नसली तरी पोतदाराच्या शिवचरित्राबद्दल काही ठोकळ अनुमाने काढा-यला ती पुरेशी आहे. या रूपरेषेवरून असे दिसते की, पोतदाराना हे चरित्र लिहिताना आधी त्या वेळची जागतिक आणि भारतीय पार्श्वभूमी विशद करायची होती आणि ती पार्श्वभूमी समोर ठेवून शिवाजीचे शक्य तेवढे वस्तुनिष्ठ चित्र तपशीलवार रंगवायचे होते. 'मी योजलेले शिवचरित्र शबल किंवा शाहिरी चरित्र नाही. तो शुद्ध इतिहास होईल!' हे पोतदाराचे म्हणणे अत्यंत महत्त्वाचे आहे

शिवाजीच्या जन्मापासून इतर अनेक बाबतीत इतिहासकारामध्ये अनेक वाद आहेत. प्रस्तुत पुस्तकात पोतदाराची काही वादग्रस्त मुद्द्यावाबतची ठाम मते आपल्याला सापडतात. त्याची काही उदा-हरणेच पाहू–(१) भोसले घराण्यासंबंधी पोतदार असा निर्वाळा देतात की ९६ कुळी क्षत्रिय घराण्यात भोसल्यांचा उल्लेख आढळत नाही. (पृष्ठ ४७ व ७१) शिवाजी हा रजपूत होता आणि त्याचे भोसले घराणे राजपुतान्यातील सिसोदियापैकीच होते. (पृ. ७१) (२) शहाजी–जिजाबाई संबंधाबाबत पोतदार लिहितात, 'शहाजी आणि जिजाबाई याचे संबंध कसे होते, असा प्रश्न नेहमी विचारण्यात येतो. शहाजीची ती नावडती बायको होती, त्याने तिला टाकले होते असा समज आहे; परंतु मला त्यात काही तथ्य वाटत नाही.' (पृ. ५७) (३) शिवाजी निरक्षर नव्हता, त्याला लिहिता–वाचता येत असावे. (पृ. ६३–६४) (४) शिवाजीला राज्याभिषेक करावा ही कल्पना कोणाची? या प्रश्नाबाबत पोतदार स्पष्ट निर्वाळा देतात की, ही कल्पना गागाभट्टाचीच होती! (पृ. ७१ व ८३) (५) शिवाजी–रामदास संबंधावाबतच्या वादावर पोतदार भाष्य करतात 'या बाबतीत आजकाल घेतल्या जाणाऱ्या भूमिका या आत्यंतिक स्वरूपाच्या आग्रही व पूर्वग्रहदूषित आहेत. या बाबतीतील सत्य जाणून घेणे आवश्यक आहे. शिवाजीला हाताशी धरून रामदासानीच स्वराज्य स्थापन केले हे म्हणणे चूक आहे त्याचप्रमाणे रामदास-स्वामीचे कार्य हे केवळ पारमार्थिक व संतांच्या निवृत्तिवादी परंपरेतील असून शिवकार्याशी त्याचा काहीही संबंध नाही असे मानणेही बरोबर नाही. खरे म्हटले तर ही दोन्ही माणसे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची व असामान्य प्रतिभेची होती. त्याची कार्ये एक-मेकाना निश्चितपणे पूरक होती.' (पृ. ८४).

पोतदार हे हाडाचे संशोधक कसे होते याचा प्रत्यय काही टिपणे वाचताना येतो. उदा. 'शहाजी व शिवाजी याच्या बिकानेर येथील जन्मपत्रिका,' 'जंजिरे राजपुरीची शिवकालीन मसलत व कोळी सरपाटील,' 'शिवछत्रपतीचे रक्षक जिऊ महाले,' 'अफझल–प्रसंगा-तील एक नवा धागा', आणि 'शिवाजीमहाराजांचा तिसरा होन' ही टिपणे याची साक्ष देतात. विशेषतः बिकानेर येथील जन्मपत्रिकाचे संशोधन व त्यावरील भाष्य फार मौलिक आहे. कारण त्यामुळे शहाजी व शिवाजीच्या जन्मतिथीची निश्चिती करण्यास हातभार लागला. शिवजन्माची फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ ही तिथी मानणाऱ्या पक्षाला एक सबळ पुरावा मिळाला, तर शहाजीच्या जन्माबाबतच्या सभ्रमावर पडदा पडला. जिजाबाईच्या मृत्यूसम-यीच्या वयाबाबत अंदाज बांधणेही यामुळे अधिक सोपे झाले. पोतदाराच्या ह्या संशोधनाचा इतिहासाभ्यासकांना कसा उपयोग झाला याचे एक उदाहरणच पाहू. श्री. दि. वि. काळे यानी मराठीत एक प्रमाणभूत शिवचरित्र लिहिले आहे. ह्या शिवचरित्राची दुसरी (१९६१) आणि तिसरी (१९७१) आवृत्ती मी मुद्दाम काढून पाहिली. दुसऱ्या आवृत्तीतल्या सनावळीत त्यानी शहाजीचे जन्मवर्ष दिलेले नाही. तिसऱ्या आवृत्तीत मात्र ३० मार्च १५९९ ही तारीख नमूद केलीय. 'शहाजी अवघ्या पाच वर्षांचा होता तेव्हा तो पोरका झाला' हे दुसऱ्या आवृत्तीतले विधान 'शहाजी अवघा सहा–सात वर्षांचा असताना पोरका झाला.' असे बदललेले तिसऱ्या आवृत्तीत

आढळते. हे सर्व निश्चितपणे पोतदारांच्या संशोधनपर टिपणाचे (१९६८) फलित होय !

तार्किक मीमासा करून एखाद्या वादविषयाचा वस्तुनिष्ठ निकाल कसा द्यावा हे पोतदाराकडून शिकावे ! या पुस्तकातील 'श्रीसमर्थ नव्हे, कवीद्र परमानंद !' 'दर्यासारंग हे नाव की पद ?' आणि 'सिंहगड पोवाडा समकालीन नसावा' हे तीन लेख पोतदारांच्या या बाबतीतल्या श्रेष्ठत्वाची ग्वाही देतात. कवी जयराम पिंडचे याच्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्याना'तील चौथ्या अध्यायातल्या एका उल्लेखानुसार शिवाजीने महाडजवळील पोलादपुरास गोस्वामीचे दर्शन घेतले. हे गोस्वामी म्हणजे रामदासस्वामी की काय ? असा प्रश्न इतिहासकाराना पडला होता; पण अत्यंत तर्कनिष्ठ मीमासा करून पोतदारांनी असं सिद्ध केलंय की, तो गोस्वामी म्हणजे रामदासस्वामी नसून कवीद्र परमानंद होय 'दर्यासारंग' हे मराठ्यांच्या आरमाराधिपतीचे पद असल्याचा समज रूढ होता. विशेषत: जदुनाथ सरकारांनी तसे मानल्यामुळे (Daria Sarang=Admiral of the Sea.) इतरांचाही तोच समज रूढ झाला; पण दर्यासारंग हे पद नसून ते नावच होते हे पोतदारानी फार सुदर रीतीने सिद्ध केलंय. तुळशीदास शाहिराचा 'सिंहगड पोवाडा' समकालीन मानला जात असे; पण ते खरे नसल्याचे पोतदारानी अगदी बिनतोड सिद्ध केले आहे. विशेषत: त्यांच्या सूक्ष्म नजरेने पुण्याची मंडई, चादवाडी रुपया आणि पुण्याची पर्वती हे पोवाड्यातले उल्लेख अचूक हेरले आणि या तिन्ही गोष्टी पेशवाईतच महत्त्व पावल्या असे सागून 'सिंहगड पोवाडा' समकालीन असणे कसे शक्य नाही हे प्रभावीपणे सिद्ध केले.

### डोळस होण्याचा संदेश

पोतदाराच्या चिकित्सक आणि बुद्धिवादी लिखाणाचे अनेक नमुने या पुस्तकात पाहायला मिळतात. आपल्याला जे चरित्र लिहायचे ते 'शाहिरी' असता कामा नये ही ह्याची जाणीव फार महत्त्वाची आहे. एके ठिकाणी पोतदार म्हणतात —

"ज्या श्रेष्ठ व्यक्तीचा वारसा आपल्याला मिळतो, ज्यांची नावे आपण उच्चारतो, त्यांच्या जीवन-चरित्राचा आपण अत्यंत बारकाईने अभ्यास केला पाहिजे. केवळ त्याची स्तुती करीत ते मोठे होते, त्याच्यात काही दोष नव्हते असे म्हणून भागत नाही." (पृ. ६७)

मुसलमान राजवटीत असख्य देवळे जमीनदोस्त केली गेली, या मुद्द्याचे विवेचन करताना ते लिहितात —

"या सर्व पुराव्याचा–गोष्टींचा खोलात जाऊन अभ्यास करून सत्य चित्र पाहता आले पाहिजे. यात भावनाप्रधान लेखन किंवा भाषण उपयोगी पडणार नाही. हिंदू मुस्लिम ऐक्यासंबंधी जे बोलले जाते ते सोडून प्रत्यक्ष त्या काळी कशी परिस्थिती होती ते पाहिले पाहिजे." (पृ. ५३)

पोतदाराना एका मुलाखतीत विचारलेला प्रश्न असा आहे— "आजच्या संदर्भात मग शिवस्मरणातून नेमकी प्रेरणा कोठची घ्यावी ?" पोतदारांनी या प्रश्नाला दिलेले उत्तर वाचून मी थक्क झालो ! वास्तविक पोतदार हे काही पुरोगामी नव्हते; पण परंपरानिष्ठ वातावरणात वाढलेला हा 'पुराणपुरुष' केवढे अर्थपूर्ण उत्तर देतो हे पाहण्यासारखे आहे —

"स्पष्ट आहे आणि ते हेच की, शिवछत्रपतीसारख्या अलौकिक पुरुषाच्या कर्तृत्वालाही मर्यादा घालणारी अवैज्ञानिकता आपण निपटून काढली पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही !" (पृ. ८६)

–शिवाजीच्या समाधीवर नद्यांच्या पाण्याच्या कावडी ओतरणाऱ्या पाणक्यांना आणि 'हार्र्र हार्र्र महादेव' अशा सदोष घोषणा देणाऱ्या अंध भाविकाना पोतदाराचा हा संदेश समजायचा नाही !

वर उल्लेखिलेल्या सर्व गोष्टींमुळे 'श्रीशिवचरित्राचे पैलू' हे पुस्तक अत्यंत मौलिक झाले आहे; परंतु त्यात अनेक त्रुटी आहेत हेही लक्षात घ्यायला हवे. पोतदाराना जी अजिबात सहन झाली नसती अशी एक तांत्रिक चूक आधी सांगतो. गंमत अशी की, या पुस्तकावर पुस्तक-प्रकाशनाची तारीख वा वर्ष कुठेही नाही. ही चूक तांत्रिक असली आणि दिसायला छोटी असली तरी इतिहासाच्या पुस्तकात– तेही पोतदाराशी संबंधित पुस्तकात अशी चूक व्हावी हे मोठं दुर्दैव आहे !

या पुस्तकाचे संपादन काहीसे अपेक्षाभंग करणारे आहे. संपादिकेची कळकळ आणि कष्ट याबद्दल आदर ठेवूनही ही वस्तुस्थिती स्पष्ट करायलाच हवी. १५८ पृष्ठाच्या या पुस्तकातली पहिली ३८ पृष्ठे सपादकीय प्रास्ताविक आहे. याचा अर्थ पोतदाराच्या १२० पृष्ठाच्या लिखाणाच्या एकतृतीयांशाइतकी दीर्घ प्रस्तावना झालेली आहे. एवढ्या मोठ्या प्रस्तावनेबद्दल अर्थातच वाचकांच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यातून संपादिका डॉ. कमल गोखले या इतिहासाच्या एक अभ्यासू प्राध्यापिका आहेत. त्यानी संभाजीवर मराठी व इंग्रजीत ग्रंथ लिहिलेत. 'The Illustrated Weekly'सारख्या साप्ताहिकात मध्यंतरी त्याचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. हे सर्व लक्षात घेता त्याच्याकडून विशेष अपेक्षा निर्माण होतात; पण या अपेक्षाची पूर्ती त्या करू शकलेल्या नाहीत. वास्तविक पाहता, या पुस्तकात समाविष्ट केलेल्या पोतदाराच्या लिखाणाबाबत त्यानी काही सखोल विवेचन करायला हवे होते. त्या लिखाणाची वैशिष्ट्ये, गुणदोष, महत्त्व वगैरे गोष्टींची चिकित्सा करायला हवी होती; पण तसे झालेले नाही. 'पोतदार' हे आडनाव कसे रूढ झाले यावर प्रस्तावनेतले पहिले दोन परिच्छेद आहेत. नंतर तिसऱ्या परिच्छेदात सुरुवातीला पुढील माहिती दिलेली आहे —

'दत्तोपंताचा जन्म दिनाक ५ ऑगस्ट इ. स. १८९० या दिवशी म्हणजे शके १८१२, मंगळवार, श्रावण वद्य पंचमीस बिरवाडी या गावी झाला. बिरवाडी हे गाव महाड तालुक्यात असून ते कुलाबा जिल्ह्यात आहे'

प्रस्तावनेच्या या सुरुवातीनंतर भाष्य करण्याचीही आवश्यकता नाही ! येथून गाडी जी सुरू होते ती पोतदारांचे जीवनचरित्र सागत सुटते. मग त्यांचे विविध क्षेत्रातले कार्य, त्यांचे इतिहास-संशोधन, लेखन, वक्तृत्व याविषयी माहिती दिलेली आहे. या माहितीच्या अनुषंगाने पुस्तकातील काही लेखांची उदाहरणे योगायोगाने येतात एवढेच काय ते ! पोतदारांनी संपादिकेच्या केलेल्या कौतुकाची माहितीही प्रस्तावनेत वेळोवेळी येऊन जाते. एकंदरीत ३८ पानी प्रस्तावनेतून अपेक्षित असे फारसे काही हाती लागत नाही. 'पैलूची जडण–घडण' असे नाव प्रस्तावनेला का दिले याचाही पत्ता लागत नाही ! वास्तविक शिवचरित्राच्या जडण-घडणीबद्दल लिहिणे आव-

श्यक होते. पण मुख्यतः सारे लिखाण आहे पोतदारांच्याच विविध पैलूंबद्दल ! त्यातही एखादी ठळक चूक जाणवतेच. उदा. पोतदारांशी संबंधित अनेक संस्थांचा ( काही फुटकळ संस्थांचाही ) उल्लेख केलेला आहे. पण ज्या संस्थांशी पोतदारांचा कमीत कमी साठ वर्षें तरी महत्त्वपूर्ण संबंध होता, त्या वक्तृत्वोत्तेजक सभेचा आणि वसंत व्याख्यानमालेचा साधा उल्लेखही नाही ! आणि गंमत अशी की, वक्तृत्वोत्तेजक सभेचे माजी अध्यक्ष असणाऱ्या पोतदारांच्या पुतळ्याचे अनावरण यंदाच्या वसंत व्याख्यानमालेच्या उद्घाटनसमारंभात झाले ! आणि त्याच प्रसंगी प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशनही झाले ! विनोद होतो तो असा !


प्रस्तावनेप्रमाणेच संपादनही काहीसे निराशजनक असून ते मुख्यतः संकलनच आहे. उत्तम संपादकीय विवेचन करणे आणि योग्य तेथे तळटीपा देणे या दोन्ही गोष्टींचा अभाव जाणवतो. पोतदारांच्या लेखांच्या निवडीत काही त्रुटी आहेत, ‘ शहाजी आणि शिवाजी ’, ‘ शिवाजी आणि व्यंकोजी ’, आणि ‘ शिवाजीमहाराजांच्या दोन राज्याभिषेकांची चिकित्सा ’ हे लेख मौलिक आहेत. पण मुळात ती पोतदारांची भाषणे असल्याने भाषणशैलीचा परिणाम त्यांच्यावर झालाय. साहजिकच पोतदार अधूनमधून तेथे विषयांतर करताना दिसतात. उदा. ‘ शिवाजी आणि व्यंकोजी’ वरील लेखात जाणवण्याइतके विषयांतर आहे. हे लेख समाविष्ट केले हे ठीक झाले ; पण तसे करताना त्यातील विषयांतरासारख्या गोष्टीची पूर्वकल्पना संपादिकेने प्रस्तावनेत द्यायला हरकत नव्हती. या पुस्तकात शिवजन्मतिथीबद्दलचा पोतदारांचा एखादा लेख समाविष्ट करणे अत्यावश्यक होते. कारण शिवाजीबद्दलचा तो गाजलेला वाद आहे. शके १५५१ फाल्गुन वद्य तृतीया (म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३०)ही शिवजन्मतिथी मानणाऱ्या पक्षाचे पोतदार हे एक खंदे प्रवक्ते होते. महाराष्ट्र शासनाने १९६६ मध्ये ‘ छत्रपति शिवाजीमहाराज जन्मतिथी निर्णय समिती ’ नेमली होती. या समितीचे अहवाल व निवेदने यांची एक पुस्तिका शासनाने १९६८ मध्ये प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेतील पोतदारांचे मूळ निवेदन, तसेच त्यांनी प्रा. न. र. फाटक यांच्या टिपणांवर लिहिलेल्या विचारांची निवेदने फार महत्त्वपूर्ण आहेत. हा सर्व मजकूर एकत्रित करून प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केला असता तर त्याचे संदर्भमूल्य अधिक वाढले असते ; पण तसे झालेले नाही. पोतदारांच्या शिवचरित्रविषयक संशोधनातला एक महत्त्वाचा पैलू दुर्लक्षितच राहिला !

अर्थात अशा काही त्रुटी असल्या तरीही ‘ श्रीशिवचरित्राचे पैलू ’ या पुस्तकातून पोतदारांच्या शिवचरित्राचे काही सुवर्णकण वाचकांच्या हाती लागतात आणि त्याचे श्रेय निश्चितपणे ‘ केसरी प्रकाशन ’ आणि डॉ. कमल गोखले यांना दिले पाहिजे. अभ्यासकांना त्यांचे कार्य उपकारक ठरणार आहे. हे पुस्तक वाचून पोतदारांच्या शिवचरित्राची उणीव अधिक स्पष्टपणे जाणवू लागते. पोतदारांचा शिवाजी आपल्याला भेटला नाही हे आपले दुर्दैव आहे! त्या शिवाजीचंही दुर्दैव कसं आहे पाहा ! पोतदारांच्या शिवाजीला इतिहासाच्या राजवाड्याऐवजी विनोदाच्या तंबूत आश्रय घ्यावा लागला !

⁂

श्रीशिवचरित्राचे पैलू
म. म. दत्तो वामन पोतदार
केसरी प्रकाशन, पुणे
पृष्ठे १५८ ( डेमी )
मूल्य १८ रुपये


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?



या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

फिनिक्स निवड

## Mysteries

(An investigation into the occult, the paranormal and the supernatural )

By : Colin Wilson

(Panther Books, pages : 667 Rs. 47.)

एखादे इंग्रजी पुस्तक विकत घेताना शेवटी index आहे की नाही, असला तर तो किती मोठा आहे हे मी बऱ्याच वेळा बघतो. विशेषतः एखाद्या अवघड विषयावरील पुस्तकात 'इंडेक्स' असला तर तो फार उपयोगी पडतो. बहुतेक करून VIP लोक जी आत्मचरित्रे लिहितात त्याच्यामागे इन्डेक्स असतोच. त्यामुळे जाडजुड पुस्तकात त्या VIPशी निगडित एखादी महत्त्वाची घटना अमक्या पानावर आहे हे फार लवकर सापडते. अगदी अलीकडे मी इन्डेक्सचा निकष पुस्तक विकत घेताना लावू लागलो. पुस्तक जितके जास्त अभ्यासू तेवढा त्याचा इडेक्स मोठा. मराठी पुस्तकाना अर्थात इंडेक्स फार दुर्मिळ आहेत. या कारणासाठी तो निकष मराठी पुस्तकाना लावता येत नाही. तसा तो सर्व इंग्रजी पुस्तकांनाही लावता येत नाही. कधी कधी असेही होते की एखाद्या उत्तम इंग्रजी पुस्तकालाही इन्डेक्स नसतो. इंडेक्स हा पुस्तके निवडण्याचा एकमेव निकष नसतो. वाचकाची मागणी, पुस्तक क्लासिक आहे की नाही, बजेट, पुस्तकाचा विषय अशा अनेक बाबीचा विचार करून पुस्तके निवडावी लागतात.

कॉलीन विल्सनच्या या पुस्तकाला मात्र एक भला मोठा इंडेक्स आहे.

कॉलीन विल्सन प्रकाशझोतात आला तो त्याच्या The Outsider या पुस्तकामुळे. काही लोक म्हणतात की त्याचे हे आउटसाइडर हे अल्बेर कामूच्या त्याच नावाच्या पुस्तकाला प्रत्युत्तर आहे. दोन्ही पुस्तके अस्तित्ववादावरच आहेत; पण विल्सनच्या आउटसाईडमध्ये डोस्टोव्हस्की, सार्त्र वगैरे अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेखकांचे उतारेच्या उतारे उद्धृत केलेले आहेत. म्हणजे पुस्तकाच्या लेखकाला स्वत:चे असे सागण्यासारखे कमीच असते अशी आपली समजूत असते आणि ती पुष्कळ प्रमाणात खरी असते; पण कॉलीन विल्सन या बाबतीत अपवाद ठरतील. कारण त्याचा अभ्यास दांडगा आहे. कोणताही विषय हाताळताना ते गाभ्याच्या जवळ जातात. द आउटसाइडर या पुस्तकात त्यांचे स्वत:चे जे थोडे लिखाण आहे ते मार्मिक व सडेतोड आहे.

आणखीन या पुस्तकाचा एक प्लस पॉइंट म्हणजे त्याचा लेखक हा ब्रिटिश आहे. अर्थात पुस्तकाचे मूल्यमापन ज्ञातीवरून करावे हा अक्षम्य गुन्हा आहे; पण मूळ इंग्रजी भाषा ब्रिटिशाची. त्यामुळे पुस्तक खरोखरच चागले असेल आणि ते ब्रिटिशांनी लिहिले असेल तर माझा तरी आनंद द्विगुणित होतो. नाही तर अमेरिकन स्लँग Heltuva lot of Trouble वगैरे वाचून लवकर शीण येतो. Chaste Pure English हे ब्रिटिश लेखकांना सहज रीत्या लिहिता येते. मी तर असेही वाचले आहे की, आणखीन २०० वर्षांनी अमेरिकन व ब्रिटिश इंग्रजी इतके Polarise (ध्रुवीकरण) होऊन जाईल की एकाची भाषा दुसऱ्याला कळायचीही नाही! आणखीन एक लेखक तर म्हणतो की, त्याशिवाय ऑस्ट्रेलियक इंग्रजी, इंडियन इंग्रजी अशा भरपूर नवीन भाषा निघतील व एकमेकाना त्याचा बोधही होणार नाही !

इंग्रजी भाषेचे ध्रुवीकरण हे असे होणार आहे असे भाषा शास्त्रज्ञाचे मत आहे.

हे पुस्तक इतके मोठे व इतके वाचनीय आहे की, त्यातील एक एक विषय घेतला तरी पानंच्या पानं पुरणार नाहीत. अब्राहम कोवूरसारख्या गूढ विषयाच्या संशयात्म्यांनी जर हे पुस्तक वाचले तर त्याचे हृदयपरिवर्तन होईल. त्यामुळे तुटकतुटकपणे आपण या पुस्तकाचे काही भाग बघू.

हा वाचनीय edible ठोकळा ३ भागात विभागलेला आहे. पहिला भाग भूत पलिते, राक्षस, डाकिणी, ड्रॅगन व काळविरहित पट्टा (Timeless zone) यावर आहे.

दुसऱ्या भागात 'मी' पणाचे प्रकार, सुप्त मनात प्रवेश, जादूटोणा, पृथ्वीव्यति-


नवीन दाखल झालेली पुस्तके

१. कालापुढती चार पाउलें – (शंतनुराव किर्लोस्कर याचे चरित्र)
सविता रा. भावे रु. ४०–००।–

२. श्रीशिवचरित्राचे पैलू – (म. म. द. वा. पोतदार याच्या संकल्पित शिवचरित्राची रूपरेषा)
: म. म. द. वा. पोतदार रु. १८–००।–

३. दृष्टीआडच्या सृष्टीत – ( आत्मचरित्रात्मक लेख )
: मोहन नगरकर रु. २०–००।–

ENGLISH

1. World War 3 – ( It is imminent. Read authentic nonfiction account by experienced Generals)
Shelford Bidwell

2. I '‘ M Jack (Non–fiction–The Yorkshire Ripper Murders) : Peter Kinsley & Frank Smyth Rs. 18–05।–

3. The Seven Wonders of the World – (Statue of Zeus, Temple of Artemis, Collossus of Rhodes, Hanging Gardens of Babylon, Giza Pyramids, etc.) Michael Ashley £ 1–50।–

4. War and Remembrance — (Bestseller–Fiction on World War II) : Herman Wouk Rs. 37–05

☐ उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी प्रवेश फीमध्ये भरपूर सवलत !

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

रिक्त विश्व, जुन्यापुराण्या गूढ दंतकथा, भानामती व तिसऱ्या भागात उत्क्रांती, अवकाशामधील संदेश, आत्मप्रबोधन वगैरे विषयाची माहिती आहे.

मुख्य म्हणजे ही माहिती लेखकाने एकाच दृष्टिकोनातून न देता सर्व बाजूनी विचार करून दिली आहे. गूढ विषयाला rational दृष्टिकोनातून बघावे असे सागणारा, इतके थंड विश्लेषण करणारा हा लेखक आहे.

कॉलीन विल्सन म्हणतात की, गेल्या दहा वर्षांत गूढ विषयावर इतकी माहिती उपलब्ध झाली आहे की, गूढ विषयावरील एखादे पुस्तक विकत घेतले की त्यात ESP, टेलिपथी, सायकोकिनेसिस, कीर्लीयन फोटोग्राफी, भानामती, कायाकल्प, प्लँट टेलिपथी, सायकिक सर्जरी, भावातीत ध्यान, बायोफीडबेक UFOS, परग्रहावरील जीवन वगैरे विषयांवर माहिती असते.

हे पुस्तक लिहिताना कॉलीन विल्सनला एक चमत्कारिक अनुभव आला. एके दिवशी काही कारण नसताना त्यांना कसेसेच वाटले. चिंता व भय या भावना शिगेला पोहोचल्या व त्यांचे हृदय घोडदौड करू लागले. त्याना वाटले, आता हार्ट अॅटॅक येतो की काय ? पण त्यांच्या मनाचा एक भाग पक्के जाणून होता की हार्ट अॅटॅक नाही. जसं दूध उतू जाऊन सांडायला लागतं व कमी कमी होतं तशीच त्यांची सर्व शक्ती भयाच्या भावनेने तात्पुरती कमी झाली. विल्सन एक दुष्ट चक्रात सापडले. भयामुळे चिंता व चिंतेमुळे आणखी भय व शेवटी त्यांना भयाचंच भय वाटू लागलं. त्यांनी भावना काबूत आणण्याचा प्रयत्न केला मात्र आणि ते फसले ! त्यांच्या या अनुभवाचा वेध त्यानी उत्तम घेतला आहे. काही काही लोकांना असा अनुभव निश्चित आला असेल, आउटर स्पेसमधील ब्लॅक होलविषयी आपण ऐकतो व वाचतो; पण कॉलिन विल्सन 'इनर स्पेन 'च्या ब्लॅकहोलविषयी बोलतात. आपण इथे कशाला आहोत, कोण आहोत असे प्रश्न विचारण्याऐवजी मेंटल ब्लॅक होलमध्ये डोकं खुपसून टाकावं. कधी कधी संवेदना बधिर करून घेतल्यानेच वास्तवता पेलता येते. या बधिर झालेल्या संवेदना जर कधी चुकून बाजूला सरल्या तर जीवघेणी वास्तवता इतकी प्रखर वाटते की, शरीराचे व मनाचे तुकडे तुकडे होतील की, काय, असे भय वाटते.

कित्येक वर्षांपासून कॉलीन विल्सनला आता एखादी महाभयानक बातमी ऐकायला मिळेल असे वाटत असे.

कॉलीन विल्सननी त्यांच्या The Mind Parasites या पुस्तकात असा दावा केला आहे की माणसाच्या सुप्त मनात एक प्रकारचे जीवाणू असतात व ते आपली शक्ती जळवासारखी शोषून घेतात. कॉलीन विल्सनना जो वर वर्णन केलेला भयावह अनुभव आला तो विल्सन यांच्या The Mind Parasites या पुस्तकाशी अधिक जवळचा वाटतो. असे ते म्हणतात. २८।१०।१९७९ च्या सन्डे स्टॅंडर्डमध्ये एक लेख आला होता. त्यात असे लिहिले होते की, Schizophrenia हा रोग सूक्ष्म जीवाणूमुळे होतो. बरेच रोग असे असतात की, खुद्द रुग्णांनासुद्धा आपल्याला हा रोग झाला असल्याची जाणीव नसते व कधी स्वत:वर तर कधी इतरांवर खापर फोडणे चालू असते.

कॉलीन विल्सन हे स्वत:च 'आउटसाइडर' आहेत, हे त्यानीच अनेक वेळा सांगितले आहे. 'आउटसाइडर्स'ना जगाचं सोयरसुतक काही नसतं. कॉलीन विल्सनच्या चमत्कारिक दृष्टिकोनामुळे कोण काय म्हणेल याचही त्यांना सोयरसुतक नसतं. त्यानी स्वत:शी प्रामाणिक राहून, प्रत्येक बाजूने विचार करून कसलीही भीड न ठेवता सडेतोड लिखाण केले आहे. जगातील संशयात्मे त्यांचा दृष्टिकोन वाचून निश्चितच हसतील; पण गूढ विषयात कॉलीन विल्सन हे नाव भारदस्त आहे हे विसरून चालणार नाही. ते एक उत्तम पत्रकार आहेत व टी. व्ही. रेडोओवरही येतात.

Consciousness directed back on itself produces on 'amplification effect' which is the basis of all neurosis. (Page No. 27)

यालाच मानसशास्त्रज्ञानी दुसरे नाव 'The Law of the Reversed Effort' असे दिले आहे. आपण तोतरेपणाचे एक उदाहरण बघू या. ही व्याधी ज्याला असते तो तोतरे न बोलण्याचा जेवढ्या शिकस्तीने प्रयत्न करतो तेवढ्याच प्रमाणात त्याचा तोतरेपणा वाढतो; परंतु तो जेव्हा सहानुभूती दाखवणाऱ्या माणसाबरोबर असतो तेव्हा कसलाही प्रयत्न न करता त्याचा तोतरेपणा नाहीसा होतो. कॉलीन विल्सन जेव्हा त्यांची चिंता व भय दूर करण्याचा प्रयत्न करू लागले तेव्हा त्याना प्रयत्नाच्या प्रमाणात त्या भावना वाढू लागल्याचे लक्षात आले. जेव्हा त्यांनी असल्या वेळी त्याचे लक्ष रोजच्या रहाटगाडग्याच्या समस्यामध्ये घातले तेव्हा कुठे त्या भावनांची तीव्रता हळूहळू कमी होत गेली.

याच लेखकाने जॅक द रीपर या १२–१३ वेश्यांचे खून करणाऱ्यावर Ritual in Darkness नावाची कादंबरी लिहिली आहे.

–जे. एन. पोंडा


१९३७ ते १९४७ ह्या कालखंडाचा
साधार नि विस्तृत वृत्तांत समजण्यासाठी
प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असे चरित्र !

स्वातंत्र्यवीर सावरकर

हिंदुमहासभापर्व १९३७ ते ४० रु. ३५–००
अखंड हिंदुस्थान लढापर्व १९४१ ते ४७ रु. ३५–००
लेखक : बाळाराव सावरकर
सावरकरसदन, ७१ शिवाजी उद्यान, मुंबई ४०० ०२८

## हिचकॉकला आवडलेल्या पण टी. व्ही. किंवा चित्रपट यासाठी निवड न करता आलेल्या कथांचा परिचय...

## कथा दुसरी...

# एका दगडात दोन

## स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

पॉल सॅन्टीन हा एका औषधी कंपनीचा विक्रेता होता.

त्या दिवशी दिवसभर हिंडून त्यानं भरपूर ऑर्डर्स मिळवल्या. त्यामुळं तो खुषीत होता. दिवसभराच्या श्रमांमुळे तो आता थकून गेला होता. चाळीस मैलांवर असलेल्या त्याच्या गावी तो गाडीतून भरधाव वेगानं निघाला.

रात्रीचे ११ वाजून गेले होते. केव्हा एकदा घरी जाऊन पोचतो, असं त्याला झालं. आणखी अर्ध्या तासाचा प्रश्न; पण झोपेपुढं इलाज नव्हता. जागं राहण्याचा तो आटोकाट प्रयत्न करत होता. गाडीवर मात्र अद्याप त्याचा पूर्ण ताबा होता.

त्या रस्त्यावरून या वेळी रहदारी कमी झाली होती म्हणूनच त्यानं हा रस्ता निवडला होता. तुरळक वाहतूक असली म्हणजे चिंता नाही. रस्ता खरोखरच मोकळाच होता. तेवढ्यात त्याला समोरून एक मोटार येताना दिसली.

प्रथम पुढचे दोन दिवे दिसले. ती गाडी साधारण पाव मैलांवर असेल, दिवे अत्यंत प्रखर होते. ते मंद होण्याचं चिन्ह दिसेना. ड्रायव्हर झोपला काय? पॉलनं त्या अज्ञात व्यक्तीला शिव्या हासडल्या. त्यानं आपल्या गाडीचे दिवे बारीक केले; पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यानं परत शिव्या झाडल्या आणि आपले दिवे मुद्दामच प्रखर केले; पण अद्याप त्याला धोक्याची जाणीव झाली नव्हती.

समोरची गाडी तुफान वेगानं त्याच्या दिशेला येत होती, हे स्पष्टच होतं. त्या रस्त्याला तो वेग अपेक्षित नव्हता. त्यानं यांत्रिकपणे अॅक्सिलरेटरवरचा पाय वर घेतला. रस्त्याच्या एका बाजूनं सरळ जाण्यावर तो एकाग्र झाला. समोरच्या दिव्यांवर दृष्टी जाऊ न देता तो रस्त्याकडे बघू लागला.

शेवटी व्हायचं ते झालंच! दुसरी गाडी रस्त्याच्या मधून, थोडी त्याच्याच बाजूला झुकलेली होती; पण हे कळेपर्यंत उशीर झाला. निर्णय घ्यायला अवधीच नव्हता. हॉर्नच्या बाजूला झुकून उजवीकडे घुसावं का? तोपर्यंत कदाचित दुसरा ड्रायव्हर गाडीची दिशा सावरेल, ही आशा! का सरळ दार उघडून, दगडगोट्यात किंवा चिखलात उडी मारून नशिबाची परीक्षा बघावी?

त्यानं दुसरा पर्याय निवडला, पण वेळ चुकली होती. दुसरी गाडी रेसभर सुद्धा बाजूला होत नव्हती म्हणून तो उजव्या बाजूला वळला. दुसरी गाडी त्याच्या गाडीवर डाव्या अंगाला मागच्याच चाकावर आणि त्यावरच्या पत्र्यावर वेगानं आदळली. ती बाजू चिखलाच्या दिशेला जोरात वळली. नंतर त्याची गाडी गुरुत्वाकर्षणाच्या नियमाबाहेर गेली. ती एका बाजूला कलंडली पॉल सॅन्टीन गाडीबाहेर उंच हवेत फेकला गेला!

त्याला गाडी बंद पडल्याचा किंवा कोसळल्याच्या अखेरचा दणका ऐकू आला नाही. तो बाजूच्या टेकडीवर, टणक भिंतीसारख्या जागी वेगानं आपटला. तिकडेच त्याचं चित्त लागलेलं होतं. नंतर तो घरंगळत तळाशी येऊन पडला. त्या जागी चिखल आणि लहानमोठे दगडगोटे होते. तो निपचित पडून राहिला. भोवतालचं जग शून्यवत् झालं होतं.

त्या पहिल्या क्षणी त्याला कोणतीच वेदना जाणवली नाही. वेगवान धक्क्यामुळं तो बधिर झाला होता. आपण जिवंत आहोत, एवढं त्याला कळत होतं. शुद्ध गेलेली नाही हे सुद्धा जाणवत होतं. आपल्या अंगातील हाडं जागोजाग मोडलेली आहेत आणि रक्तस्राव सुरू आहे, हे खोल कुठे तरी उमगत होतं.

डोळ्यांसमोर अंधारी आणणारे प्रखर दिवे अदृश्य झाले होते. कुठल्या तरी काटेरी वनस्पतीवर पाठीचा काही भाग आला होता. त्याच्या डोक्यावर तारे आणि पूर्ण चंद्र चमकत होता. तारे नेहमीपेक्षा काहीसे जवळ आल्यासारखे वाटत होते. कदाचित त्या दृष्टिभ्रमामुळे त्याला प्रथमच कल्पना आली की आपण लवकरच मरणार आहोत!

त्या क्षणी त्याला अजिबात राग आला नाही. धडक बसण्यापूर्वीचा राग त्याला अंधुकपणे स्मरत होता; पण तो आता रागाच्या पलीकडे गेला होता. पुन्हा मृत्यूच्या विचारानं त्याच्या मनाची पकड घेतली. मरणाऱ्या माणसाला जगाबद्दल काहीच फिकीर नसते. त्याला फक्त स्वतःपुरतं बघायचं असतं. तेवढंच फार तर तो करू शकतो...

तेवढ्यात त्याच्या कानावर आवाज आले. भोवतालच्या जगाशी नव्यानं दुवा साधला जात होता. म्हणजे दुसऱ्या गाडीत एकापेक्षा अधिक लोक होते. त्यांच्याबद्दल तो विचार करू लागला. अगदी शांतपणे, त्यात राग नव्हता की लोभ; पण त्यानं सर्व लक्ष ऐकण्यावर केंद्रित केलं.

'तो इथं नाही!' एक पुरुषी आवाज आला. काहीसा तरुण.

दुसऱ्या गाडीलाही धडक बसली होती. ती अडविण्यात आली होती किंवा तिच्या ड्रायव्हरनं मुद्दाम थांबवून, आपली परिस्थिती बघण्यासाठी ते इथपर्यंत आले असावेत.

त्याला मदत करायच्या हेतूनं असेल? आपण कुठं आहोत, हे त्यांना कळावं म्हणून हाक मारावी का? त्याला विचार पडला. गाडी चालवताना जरी त्यांच्या हातून चूक झाली होती तरी आपल्यापर्यंत येण्याचा

चागुलपणा त्यांनी दाखवलाच की! पण पुन्हा त्याला वाटलं की ते खरंच मित्रत्वानं वागतील का? एकाएकी त्याला त्याच्याबद्दल जबरदस्त भीती वाटू लागली. का कोणास ठाऊक! खरं म्हणजे अपघातात सापडलेल्या माणसाला सगळे जण मदत करू इच्छितात, नाही का?

'तो बाहेर फेकला गेला असेल!' एका मुलीचा घाबरलेला आवाज आला.

'शक्य आहे. आपण काय करायचं?' आधीचा पुरुषी आवाज आला. म्हणजे ते दोघंच असले पाहिजेत.

'त्याला शोधून काढू!' ती म्हणाली.

'कशाला?' नाखूष स्वर. त्यानं तोच प्रश्न पुन्हा केला.

'त्याला...किंवा तिला काय झालंय हे तुला बघावंसं वाटत नाही?'

'मला काही कळत नाही.' पुरुषाच्या आवाजात कंप होता.

'मला वाटतं, आपण त्याला शोधून काढलेलं बरं!'

'ठीक आहे...पण अंधार केवढा आहे!'

'तुझ्याकडे फ्लॅश आहे, नाही का?'

'आहे. मी घेऊन येतो.'

रस्त्यावर पावलांचा आवाज. तो मुलगा टॉर्च आणण्यासाठी आपल्या गाडीकडे परतला. पुन्हा सगळीकडे सामसूम.

पॉलनं श्वास रोखला. नव्या भीतीमुळं त्याला घाम फुटला. त्या दोन व्यक्तींचे आवाज त्याला आवडले नव्हते. तो मुलगा आणि मुलगी, दोघानाही त्याची खरी काळजी नव्हती. आपण मरणार असू तर त्याची फारशी मदत होईल, ही आशाच करायला नको!

आपण मरणार! त्याची जवळजवळ खात्री पटली होती. आता वेदना सुरू झाल्या. त्यांच्या जागा कळत होत्या. त्याचा चेहरा, छाती, दोन्ही पाय आणि छातीमध्ये कुठे तरी खोल! त्या जागी डॉक्टरशिवाय कोणी पोचू शकणार नव्हतं. त्या ठिकाणच्या वेदनामुळं त्याला मरणाविषयी शंकाच उरली नाही!

त्यामुळं आता काहीच फरक पडत नाही. त्या दोघांना आपण सापडलो काय अन् नाही काय!

'मी टॉर्च आणलेला आहे.' मुलाचा आवाज. 'आपण कुठं बघायच?'

'मला वाटतं, चिखलाच्या बाजूला.'

पावलाचा स्पष्ट आवाज. दगडगोटे सरकवले जातात. गवत आणि झुडुपांची सळसळ. पुढे-मागे टॉर्चच्या प्रकाशाची धावपळ. पावलांचा आवाज आणि प्रकाश जवळ येत चालला. आपण त्याना आता सापडणारच! त्यांना हाक मारून त्याचा वेळ वाचवावा का? त्यानं तसं केलं नाही; पण तो वाट बघत थाबला.

'हे बघ!'

त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश पडला. अंगातलं त्राण गेल्यामुळं त्यानं चेहरा वळवला नाही. पावलं वेगानं पडल्याचे आवाज आणि दोघंजण तिथे पोहोचले. त्याच्या डोक्याजवळ दोन आकृती उंच उभ्या. आकाशाची पार्श्वभूमी. त्याच्या डोळ्यांवर प्रखर प्रकाश. त्यानं डोळे बारीक केले. तरीसुद्धा त्याला उजेडाचा त्रास होतोय, हे त्याच्या लक्षात आलं नाही.

'तो जिवंत आहे,' मुलगी म्हणाली. 'त्याचे डोळे उघडे आहेत.'

'हं, बघितलं...'

'पण तो जखमी झाला आहे.' मुलगी खाली वाकली. मोठी मेहेरबानी झाली. दिव्याच्या प्रकाशापासून तो (काही काळ) बचावला. चंद्राच्या भरपूर प्रकाशात त्याला तिचा चेहरा दिसला.

ती फारच तरुण होती. फार तर सोळाची. देखणीसुद्धा होती. चेहऱ्याला मेकप कळण्याइतका; पण त्यावर कुठलीच भावना नव्हती. तिला धक्का बसला असावा कदाचित. त्याच्या सर्वांगावरील जखमा पाहूनही तिच्या नजरेत करुणा दिसली नाही.

'तुम्हाला बरीच दुखापत झालेली दिसते?' तिनं त्याला प्रश्न केला.

'हो...' फारसा त्रास न होता आपण बोलू शकतो; हा शोध त्याला लागला.

'कुठे कुठे? सांगता येईल?'

'सगळीकडे, पण आतमध्ये जास्तच!'

हे उत्तर ऐकून मुलगी विचारात पडली. तिनं थंडचा स्वरात पुढचा हिशेबी प्रश्न केला. 'आम्ही जर मदत आणली तर तुम्ही वाचू शकाल, असं वाटतं का?'

त्यालाही हाच प्रश्न पडला होता. उत्तर देण्यापूर्वी त्यानं बराच विचार केला; पण शेवटी नको ती चूक केलीच. 'मला वाटतं मी मरणारच!' हे बोलून झाल्याक्षणी त्याला आपली चूक उमगली.

मुलीचा चेहरा एकदम बदलला. त्यामागचे भाव गूढ राहिले. ती एकदम मागे सरकली आणि उभी राहिली.

'तो मरणार आहे,' ती म्हणाली. जण पॉलइतकीच तिची खात्री झाली होती.

'मग डॉक्टरला शोधण्यात काहीच अर्थ नाही काय?' मुलाच्या आवाजात सुटकेचा निश्वास होता. म्हणजे या सगळ्या प्रकारातील जबाबदारीतून तो मुक्त झाला होता.

'मलाही तेच वाटतं.'

'मग आपण काय करायचं?'

'काहीच नाही. आपण इथेच थांबू या! एखादी गाडी इकडे येईलच.'

'म्हणजे आपल्याला गावात परतता येईल, असंच ना?' तो मुलगा बहुधा प्रत्येक निर्णयासाठी तिच्यावर अवलंबून होता.

'होय. आपण एखाद्या डॉक्टरला किंवा कोणाला तरी इथे पाठवून देऊ आणि आपल्याला पोलिसांना वर्दी द्यायला हवी.'

'पोलीस?'

'द्यायलाच हवी! तू एका माणसाला मारलेलं आहेस!' त्यावर शांतता पसरली. पॉल दोघांच्या पायाशी पडला होता. तो त्यांच्या अस्पष्ट आकृतीकडे बघत राहिला. तो ठार झालेला आहे, असं ते गृहीत धरत होते; पण त्याचाही राग त्याला येईना. कदाचित तोही स्वतःला मेल्यात जमा धरत होता.

'लिनी...ते माझं काय करतील?'

'कोण पोलीस?'

'हो...तू म्हणालीस की मी याला मारलं!'

'मग, मारलंस ही वस्तुस्थिती आहे!'

मुलगा गडबडला, 'पण तो अपघात होता!' तो कसंबसं म्हणाला. 'तुला ठाऊकच आहे की तो अपघात होता. म्हणजे नकळत घडला...'

'तेही खरंच!'

ते हलक्या आवाजात बोलत असले तरी पॉल सॅन्टीनला प्रत्येक शब्द ऐकू येत होता. त्याला बोलल्यावाचून राहवलं नाही. 'प्रत्येक अपघात ही कोणाची तरी चूक असतेच!' त्यानं दोघाना ऐकवलं.

दोघंजण हादरली. त्यानी आधी एकमेकांकडे पाहिलं आणि नंतर खाली त्याच्याकडे.

, तुमच्या बोलण्याचा अर्थ काय, मिस्टर ?' मुलानं प्रश्न केला.

'हा अपघात तुमच्या चुकीनं घडला, हेच मला सांगायचंय!' अजूनही त्याला राग आला नव्हता. दोष कोणाचा होता, एवढं प्रस्थापित करावं, हाच त्या बोलण्यामागचा हेतू.

'चूक माझी कशी ?'

'पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही दिवे बारीक केले नाहीत...'

'तुम्ही सुद्धा केले नाहीत!'

'पहिल्यांदा मीच केले.'

'पण लगेच प्रखर केलेत.'

'तुम्ही लहान केले नाहीत म्हणूनच केवळ.'

मुलगा क्षणभर गप्प बसला. नंतर म्हणाला, 'पण आम्ही आदळलो तेव्हा तुमचे दिवे फार मोठे होते !'

पॉलला ते मान्यच होतं. 'मी चिडलो होतो.' तो म्हणाला, 'पण ती गोष्ट महत्त्वाची नाही. तुम्ही रस्त्यावर माझ्या बाजूला आक्रमण केलं होतं !'

तो मुलगा मुलीकडे पाहू लागला. 'लिनी, मी यांच्या बाजूनं गाडी चालवत होतो ?'

ती बहुतेक हसली असावी. 'मला कसं कळणार ? कारण त्या वेळी—'

तिनं वाक्य पुरं केलं नाही; पण पॉलनं बाकीचा अंदाज केला. त्या दोघांना जगाची शुद्ध असायचं कारण नव्हतं. त्याचे चाळे सुरू असताना तो मुलगा कसला दिवे बारीक करणार ! आणि म्हणूनच त्याचा गाडीवर ताबा नव्हता. त्यांचा खेळ झाला पण त्याची किंमत मोजावी लागतीय आपल्याला !

त्यामुळं त्याला एकदाचा राग आला. त्याची तऱ्हा मात्र वेगळी होती. त्यात एक प्रकारचा त्रयस्थपणा होता. कारण आता त्याचा काहीच उपयोग नव्हता. काही झाले तरी तो वाचणार नव्हता.

पण त्याला एक प्रकारचं समाधान वाटलं. तो ठासून आणि आत्मविश्वासानं बोलत होता. 'कळलं का ? तुम्ही चुकीच्या बाजूनं येत होता. म्हणून चूक तुमचीच होती!'

मुलगा मुलीकडे बघतच हे ऐकत होता. 'ते मला काय करतील ? म्हणजे मला पोलिस म्हणायचंय.' त्यानं तिला विचारलं.

'मला काय ठाऊक?' तिनं ताडकन् म्हटलं. इतका वेळ ती कशी शांत होती आता बहुतेक तिचा पहिला धक्का ओसरला असावा. ती आता घाबरली होती, अस्वस्थ बनली होती.

'मी जरी रस्त्याच्या चुकीच्या बाजूला असलो तरीही तो अपघातच होता. मी काही याच्या गाडीवर मुद्दाम आदळलो नाही. त्याला ठार करायचा माझा हेतू नव्हता !'

'मान्य आहे—'

'वर्तमानपत्रात तू वाचतच असशील. ड्रायव्हरला फारशी शिक्षा होत नाही. दंड होऊ शकतो; पण माझे वडील तो भरून टाकतील. आणि समजा मला तुरुंगात जावं लागलं तरी जास्त दिवस नाही काही. तुला काय वाटतं ? तीस दिवस ?'

'किंवा कदाचित् साठ म्हणजे काही फार नाही !'

पॉल त्यांचं बोलणं ऐकत होता. हळूहळू त्याच्या रागाचा पारा चढू लागला. 'किंवा कदाचित नव्वद दिवस सुद्धा ! तो पुढे म्हणणार होता. एखादी विमा कंपनी पैसे भरील; पण खुनी माणसाला पुरेशी सजा मिळणार नाही. खुनाबद्दल नव्वद दिवस !'

'पण ही झाली एकच गोष्ट;' मुलगा एकदम म्हणाला.

'काय ?'

'हा अपघात ठरेल आणि दोष कदाचित माझ्यावर येईल. थोडाका होईना ! म्हणजे हा माणूस कोणाजवळ आपलं तोंड उघडणार नसेल तर !'

'कशाबद्दल म्हणतोयस ?'

'गाडीच्या दिव्यांबद्दल. कोणी दिवे बारीक केले आणि कोणी नाही आणि रस्त्याची बाजू कोणी सोडली; पण तो जर मेलाच तर हा सगळा प्रश्न मिटून जाईल !'

'बरोबर आहे !' मुलीच्या आवाजात बदल जाणवला. तिला आपली भूमिका समजली होती.

'म्हणजे हा मेलाच पाहिजे. माझं म्हणणं समजलं का, लिन् ?'

'तो म्हणालाच की आपण मरणार आहोत—'

'हो, पण त्यालाही नक्की सांगता येणार नाही आणि आपल्यालाही. तो मेला तर पाहिजेच. तो मेल्याची आपण खात्री करून घेतली पाहिजे!' मुलगा वेडाचा झटका आल्याप्रमाणे तारस्वरात ओरडला.

मुलीनं मुलाचा दंड पकडलेला पॉलनं पाहिला. तिला भीतीनं घेरल्याचं चेहऱ्यावरून दिसत होतं.

'आणखी एक गोष्ट आहे. मुलगा अडखळत घाईनं म्हणू लागला. 'माझ्या वडिलांनी विम्याचं बरंच काही सांगितलं. अपघातात अपंग झालेल्या माणसाला जास्त नुकसानभरपाई द्यावी लागते. त्यापेक्षा माणूस मेलेला परवडतो! आम्ही उतरलेला विमा कुठल्या प्रकारचा आहे, हे मला नक्की ठाऊक नाही. हा माणूस जर मेला नाही आणि त्याला गंभीर इजा झाली असेल तर आम्हाला ते महागात पडेल आणि—बाप रे ! माझे वडील मला फोडून काढतील !'

ती मुलगी थरथर कापू लागली. 'पण तो मरणारच आहे!' ती घुसमटलेल्या आवाजात म्हणाली.

'ते आपण कसं सांगू शकणार ? सांग ना ?'

पॉलच्या वेदना कुठल्याकुठे पळाल्या. त्यांची जागा तीव्र संतापानं घेतली. मदत दूरच राहिली, उलट त्यांना आपण मरतो की नाही हीच चिंता पडली आहे. किती स्वार्थी मुलं ! आणि हे सगळं आपल्या देखत बोलण्याचं धैर्य— नव्हे क्रौर्य त्यांच्यात आहे !

तो मुलगा एकदम गुडघ्यावर बसला आणि दिव्यानं पॉलचा चेहरा पुन्हा न्याहाळू लागला. तो प्रकाश पॉलला सहन होत नव्हता तरीही त्यानं मुलाकडे बघितलं. किती तरुण आहे हा ! अगदी मुलीसारखाच; पण तिच्या एवढा शांत नाही. त्याच्या डोळ्यांत गोंधळ दिसत होता. तोही जखमी झाला होता. त्याच्या डोक्याच्या डाव्या बाजूला खोक पडली होती. त्या जागेच्या केसांवर रक्त लागलं होतं.

'तुम्हाला कसं वाटतं मिस्टर ?' मुलानं प्रश्न विचारला.

पॉलनं उत्तर गिळून टाकलं. तो आता मुलांना कसलंही समाधान मिळू देणार नव्हता. त्याच्या छातीतून वेदनाचे प्रवाह वाहात होते. मृत्यू त्याच्या कानात कुजबुजत होता, शरीर सोडून द्यायची गळ घालत होता; पण हे त्यांना सांगायची चूक तो पुन्हा करणार नव्हता.

मुलाच्या चेहऱ्यावरील अगतिकता त्याला स्पष्ट दिसत होती. मुलानं पॉलच्या सगळ्या

अंगावरून दोन–तीन वेळा दिवा फिरवला. नंतर तो उभा राहिला.

'तो मरण्याइतका जवर जखमी झालेला नाही!' तो मुलीला म्हणाला.

'नाही, वरून तसं दिसणार नाही.' पॉल मनात म्हणाला. गंभीर बिघाड आत झालेला आहे आणि तो जिवाला घातक आहे; पण हे त्यांना सांगायचं नाही. त्यांना चांगला घाम फुटू दे आणि तू कदाचित जिवंत राहशील! कोणी ना कोणी येईलच की!

अचानक झालेल्या वेदनामुळं त्याची विचारतंद्री भंग पावली. त्याची शुद्ध जवळ-जवळ हरपली.

मुलगी जोरात किंचाळली. जणू काही जखमी माणसासाठीच. कारण मुलानं त्याला सणसणीत लाथ मारली होती. 'तू हे काय करतोयस?' तिनं जाब विचारला.

मुलानंही किंचाळून उत्तर दिलं, 'तो मेलाच पाहिजे. त्याला जिवंत ठेवता कामा नये!'

मुलीत थोडाफार चांगुलपणा असावा किंवा स्त्रियांमध्ये असलेली करुणा! 'पण तू असं करता कामा नये!' तिनं त्याला त्वेषानं सांगितलं.

'त्यात काय बिघडतं?'

त्यानं आरडाओरडी करत बाजू मांडली. 'मी त्याला आधीच मारलेल आहे. तो आता लवकर मरावा एवढंच! तुझ्या लक्षात कसं येत नाही, लिनी?'

तिला खरोखर कळत नव्हतं.त्याला धरून ती मागे ओढू लागली.

'कोणालाच काही कळणार नाही!' त्याच्या बोलण्यात तथ्य होतं. 'तो आधीच जखमी झालेला आहे. त्यांना वाटेल की अपघातात त्याचा अंत झाला!'

दोघजण काही काळ गप्प बसली. पण अंधारात चिकटून उभ्या राहिलेल्या त्या दोन आकृती पॉल पडल्या जागेवरून बघत होता. दोघानी आलिंगन दिलं होतं.मुलीच्या पोटात दया होती. मुलगा स्वत.ची कातडी बचवण्यासाठी हिंस्त्र बनला होता; पण मुलीचं त्याच्यावर प्रेम होतं म्हणूनच तर तो या वेळी त्याच्या बरोबर यात अडकली होती.

'ठीक आहे, व्हिन्स!' अखेर तिचा आवाज आला.

पण पॉल तिथेच पडून राहण्याखेरीज काहीच करू शकत नव्हता. बहुतेक त्याला लाथा-बुक्क्या खाऊनच प्राण गमवावे लागणार! मुलाचा दुष्टपणा तर्कसंगत होता. त्यात खूनही बसत होता, आधीच्या प्रकाराने येणारा मृत्यू त्याला मंजूर होता; पण दुसऱ्या प्रकाराचा त्याला जबरदस्त धडकी बसली.

'नको!' सारी शक्ती एकवटून तो ओरडला, 'नको!'

त्याच्या आरोळीमुळे दोघांची मिठी सैल झाली. पुन्हा त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश पडला. पॉल बाजूला वळला नाही. त्याच्या डोळ्यातली भीती दोघांना दिसायला पाहिजे होती.

'तुला ते जमेल का पण?' मुलीने विचारलं. तिचा आवाज स्थिर झाला होता. तिला ती गोष्ट पटल्यामुळं दोघांच्यात तीच खंबीर बनली होती.

'कोणास ठाऊक!' तो म्हणाला; 'पण मला तसं केलंच पाहिजे!'

पॉल सॅन्टीनला तो जवळ येताना दिसला आणि त्यानं डोळे मिटून घेतले

'थांब!' तिचा आवाज खूप दुरून आल्यासारखा त्याला वाटला. त्याची जीभ लुळी पडली.

'काय झालं?'

'तुझ्या अंगाला रक्त लागलं असेल, बघ!'

'असेल. त्यामुळं काय फरक पडणार?'

'व्हिन्स, तुला वेड तर लागलं नाही? त्यांना हे रक्त दिसेल. एखाद्याला शंका आली तर त्याची तपासणी करतील आणि ते कुणाचं होतं हे शोधून काढतील!'

आशेचा किरण दिसल्यामुळं पॉलनं डोळे उघडायचं धाडसं केलं. मुलगा त्याला खलास करण्यासाठी खाली वाकलेला होता; पण तो मागे वळला!

'काय करायला हवं, ते माझ्या ध्यानात आलेलं आहे!' तो बऱ्याच वेळानं म्हणाला.

तो अंधारात दिसेनासा झाला; पण पॉलला झाडाच्या फांद्याचे आवाज येत होते. नंतर त्या मुलाची हाक आली.

'लीन, इकडे ये! मला हे उचलायला मदत कर!'

या वेळी पानांची जास्तच सळसळ. मुलगी मुलाजवळ पोचली.

मुलाचा उत्तेजित आवाज आला, 'हे बघ, तो इसम गाडीतून फेकला गेला काय? मग त्याचं डोकं या इथ आदळलं. बास्! आपलं काम झालं. आपण फक्त त्याचं शरीर योग्य दिसेल अशा प्रकारे वळवू! चल लवकर, हे उचलायला हात दे. मला एकट्यानं जमणार नाही!'

परतीच्या पावलांचे आवाज. जीव छातीत गोळा करून पॉल तिकडे बघू लागला. ते दोघं पाठी वाकलेल्या स्थितीत, काहीतरी मोठं ओझं घेऊन त्याच्याकडेच येत होते तो पदार्थ बराच पसरट असावा या वेळी तो किंचाळला नाही. कारण ते शक्यच नव्हतं. त्याचं स्वरयंत्र बंद पडलं होतं, तो फक्त बघू शकत होता, मुलं सावकाश, प्रयासपूर्वक येत होती, मग ती थांबली. त्याच्या एका बाजूला एक, दुसऱ्या बाजूला एक आणि त्याच्या डोक्यावर एक भला मोठा, पसरट पण जड पदार्थ त्यानी धरलेला होता. त्यामुळं आकाश दिसेनासं झालं.

अगदी अखेरच्या क्षणी त्याच्या एक गोष्ट लक्षात आली. त्याला अतिशय समाधान झालं. आपण नाही तरी मरणारच होतो. या मार्गानं आपण लवकर सुटू. ही आपल्यावर कृपाच आहे; पण तो आहे खूनच!

त्यानं प्रार्थना केली. आगळी–वेगळी प्रार्थना. 'एखादा हुशार पोलीसअधिकारी इथे यावा!'

राष्ट्रीय हमरस्त्यावर गस्त घालणारा सार्जंट व्हेनेक तितकाच हुशार होता. पहाटेच्या अंधुक प्रकाशात त्यानं रस्त्यावरील चाकांच्या खुणा तपासल्या. गडद डाबरी रस्त्यावर त्या स्पष्ट कळून येत नव्हत्या; म्हणून त्याची नीट खात्री झाली नव्हती.

त्याच्या गाडीजवळ उभ्या असलेल्या जोडीबद्दल त्याचं निश्चित मत बनत नव्हतं. त्याचं काम सुरू असताना दोघंजण गुपचुप बघत होते. मुलाचं नाव. होतं व्हिन्स आणि आणि मुलीचं आलिन. अशा दुर्दैवी अपघातात सापडणाऱ्या इतर मुलांप्रमाणेच ही दोघं दिसत होती आणि त्याच्यात वेगळेपणाही होता. म्हणून उजेड वाढल्यावर त्यानं तपास पुढं चालू केला.

त्याला अपेक्षित होतं त्यापेक्षा अधिक काही तरी आढळलं. मृताचं शरीर आधीच हलवण्यात आलं होतं. तो भाग बराच तुडवला गेला होता. तरीही त्याला पुरावा मिळालाच अगदी बिनतोड आणि स्पष्ट पुरावा!

तो चिखलातून बाहेर पडला आणि दोन मुलांजवळ गेला. त्याच्या चेहऱ्यावरील घाबरल्याचे भाव पाहून मुलाचा चेहरा पडला.

'काय झालं, सार्जंट?' त्यानं विचारलं.

'प्रत्येक दगडाला दोन बाजू असतात.' सार्जंट म्हणाला, 'पावसामुळं वरची बाजू नेहमी स्वच्छ राहते. जमिनीच्या संपर्कामुळं तळाची बाजू घाण असते. तेव्हा मला आता असं सांगा–मि. सॅनटीन कशा रीतीनं गाडीबाहेर फेकले गेले..ज्यामुळं दगडाच्या खालच्या भागाबरोबर त्याचं डोकं आदळलं?' □

(मूळ लेखक : सी. बी. गिलफर्ड)

# हिराबाईंचा 'गोड' सत्कार : पृष्ठ १ वरून

नव्हती. त्यामुळे अनेक गीतांना चाली देऊनही माझं नाव फारसं कोणाला माहीत नव्हतं. एक दिवस कंपनीचे संचालक वसंतराव कामेरकर मला म्हणाले—' हिराबाईंच्या दोन गाण्यांना चाली द्यायच्या आहेत. तू ते काम करशील का ?' माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. कारण हिराबाई मला गुरुतुल्य होत्या. कोल्हापूरच्या महाद्वाररोडवर सेंट्रल रेस्टॉरंट नावाचं एक हॉटेल होतं. त्या हॉटेलमध्ये उत्तमोत्तम रेकॉर्डस लावत असत. त्यामुळे खिशात पैसे असतील तेव्हा मी सेंट्रल रेस्टॉरंटमध्ये जाऊन दोन पैशाचा चहा पीत हिराबाईंच्या रेकॉर्डस ऐकत बसायचो. खिशात पैसे नसतील तर हॉटेल बाहेर तासन तास उभं राहून एकलव्याप्रमाणे माझी हिराबाईंच्या गायनाची साधना चालत असे. त्यामुळे अशा महान गायिकेच्या गाण्याना चाली द्यायला मिळणार या कल्पनेने मी पुलकित झालो.

'हिराबाई आल्या. त्यांचं व्यक्तिमत्त्व शालीनतेचं मूर्तिमंत प्रतीक होतं. त्यांच्या बरोबर शमसुद्दीन खाँसाहेब होते. नंदलाला नाच रे नाच रे प्रियलाला' आणि 'विनवीत शबरी रघुरायाते' अशी दोन गाणी हिराबाईंकडून रेकॉर्ड करून घ्यायची होती. मी त्याना गाण्याच्या चाली सांगितल्या व म्हटलं 'मला या चाली चांगल्या वाटतात, पण तुम्हाला हवं तसं तुम्ही म्हणा !' हिराबाई म्हणाल्या, 'तसं नाही. तुम्ही चाली दिल्या आहेत, तुम्हीच त्या मला शिकवल्या पाहिजेत !' मी हतबुद्धच झालो. पण माझाही इलाज नव्हता. मी एकेक गाणं हिराबाईंना म्हणून दाखवलं. त्यानी नोटेशन करून घेतलं आणि दुसऱ्या दिवशी नोटेशन्ससह पाठ म्हणून दाखवलं. त्यानंतर सहा-सात दिवस आम्ही दोघांनी मिळून तालमी केल्या व मग ती दोन गाणी रेकॉर्ड केली. पुढे ती पुष्कळ लोकप्रियही झाली. पण या सर्व प्रसंगातून विद्वत्ता व नम्रता आणि विद्वत्ता व शिकण्याची वृत्ती या दोन गोष्टी एकत्र आल्या तर कसं दैवी तेज निर्माण होतं याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला. शिकवताना विनम्र व्हावं हे त्यानी मला नकळतपणे शिकवलेलं. जन्मोजन्मी जपून ठेवावा असा हा अनुभव होता.'

श्री. सुधीर फडके यांच्यानंतर पंडित भीमसेन जोशी बोलायला उभे राहिले. कडाडीचा प्रभाव जाणवणाऱ्या मराठीमध्ये बोलताना पंडितजींनी हिराबाईंच्या गायकीची विविध वैशिष्ट्ये स्पष्ट केली. ते म्हणाले—

१९४६ साली हिराबाईंशी माझा परिचय झाला. तत्पूर्वी १९३२ साली आमच्या गदगला सुलोचना पालकराच्या नाटक कंपनीचे 'संशयकल्लोळ' लागलं होतं. त्यामध्ये हिराबाईंचं 'राधेकृष्ण बोल' हे पद ऐकलं नि मी मोहित होऊन गेलो. माझे वडील शिक्षणतज्ज्ञ. नाटका बिटकाला जाणं त्यांना खपत नसे. त्यामुळं त्यांची नजर चुकवून, त्यांच्या खिशातले चार आणे चोरून मी हे नाटक पाहयला गेलो हिराबाईचं गायन नीटनेटकं, स्वच्छ, करुणरसानं भरलेलं होतं. त्या तालामध्ये अत्यंत पक्क्या, लय आणि स्वर इतक्या उत्तमपणे मिसळून गाणारी दुसरी गायिका नाही ! माझ्यावर मुलासारखं प्रेम करणाऱ्या हिराबाई संगीतक्षेत्रातल्या चिरंतन स्वरगंगा आहेत.'

या समारंभाला खासदार यशवंतराव चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार होते. पण अचानक काही अडचण आल्यामुळं ते येऊ शकले नाहीत. त्यामुळं प्रसिद्ध नाटककार व समीक्षक वसंत शांताराम देसाई यांनी समारंभाचं अध्यक्षपद भूषवलं.

'ज्या रंगमंदिरात हा समारंभ होतोय त्याच्या नावाला शोभेल असाच तो आहे.' अशी सुंदर सुरुवात करून श्री. देसाई म्हणाले, 'गेली पन्नास वर्षं हिराबाईंनी आपला स्वर हिंदुस्थानात चौफेर पसरवला. स्वतःच्या गाण्याबरोबरच हिंदुस्थानी संगीतही त्यांनी सामान्य माणसापर्यंत पोचवलं म्हणून कलेच्या दृष्टीनं हिराबाई लोकशाहीच्या गायिका आहेत; पण हे करत असताना स्वतः लोकप्रियतेच्या मागं न लागता त्यांनी संगीताचा दर्जाही कायम ठेवला हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे.

'मला आठवतं, एकदा 'सौभद्र'मध्ये हिराबाईंनी सुभद्रेची भूमिका केली होती, तर बालगंधर्व अर्जुन झाले होते पुढे हिराबाईंचं गाणं सुरू झालं आणि त्रिदंडी संन्यास घेतलेला अर्जुनही आपला संन्यास विसरून माना डोलवू लागला !'

'उत्तम गाणं आणि त्यापासून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो असं माझं मत आहे. पंचावन्न-साठ वर्षांपूर्वी हिराबाईंनी त्यांच्या कारकीर्दीला सुरुवात केली तेव्हा वझेबुवानी त्यांचं गाणं ऐकलं आणि म्हणाले-'हे गाणं ऐकून एखादा आजारी माणूससुद्धा बरा होईल !' हिराबाईंच्या गानसामर्थ्याची आणखी पावती काय असू शकते ?'

हिराबाईंच्या गायनाची वैशिष्ट्यं स्पष्ट करत असतानाच श्री. देसाईंनी त्यांच्या जीवनातील एका अतिशय वेगळ्या मुद्द्याकडे श्रोत्यांचं लक्ष वेधलं. 'संकटाच्या, अडीअडचणीच्या वेळी हिराबाई बडोदेकर कुटुंबियांच्या आधारस्तंभ ठरल्या आहेत ! गाण्याप्रमाणेच मनानेही सुरेल असणाऱ्या हिराबाईंनी गाण्यात ताल व वर्तनात तोल सांभाळून आपळं गायन आणि जीवन एकरूप करून टाकलं आहे.'

सत्कारामुळे सद्गदित झालेल्या हिराबाईंनी सत्काराला क्षीण आवाजात उत्तर

दिलं—

'गेले दोन तीन दिवस असंख्य ज्ञात-अज्ञात रसिकांकडून माझ्यावर तारांचा आणि पत्रांचा जो वर्षाव होत आहे त्यामुळे मी अक्षरशः भारावून गेले आहे. मी गाण्यातून निवृत्त होऊन सात वर्षं झाली. सर्वसाधारणपणे मनुष्य एकदा निवृत्त झाला की समाजाला त्याचं स्मरण राहात नाही; पण आपण सर्वांनी माझं स्मरण ठेवलंत याबद्दल मला आनंद वाटतो!'

'मी आयुष्यात जे काही केलं ते मुनापासून केलं, प्रामाणिकपणे केलं, जीव तोडून केलं. ते करत असताना स्वतः त्याचा आनंद उपभोगला, इतरांनाही त्यामध्ये समाविष्ट करून घेतलं.'

'आजच्या पिढीत चमचमणाऱ्या असंख्य तारका पाहून मला अतिशय समाधान वाटतं. या पिढीबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही. त्यांना फक्त एकच सांगावंसं वाटतं की आज जीवन कितीही गतिमान झालं तरी गायन चार महिन्यात शिकून तयार होता येत नाही. संगीत ही एक कठोर साधना आहे हे लक्षात घेऊन तरुण कलाकारांनी ते आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा!'

याच समारंभात हिराबाईंनी ज्या तंबोऱ्यावर स्वत:च्या गायनसाधनेला प्रारंभ केला तो तंबोरा पुण्यातल्या राजा केळकर संग्रहालयामध्ये ठेवण्यासाठी संग्रहालयाचे संचालक डॉ. दिनकरराव केळकर यांच्या स्वाधीन करण्यात आला.

हिराबाईंच्या सत्कारसोहळ्याचा उत्तरार्धही समारंभाला साजेसाच होता. हिराबाईंच्या शिष्या डॉ. प्रभा अत्रे, श्रीमती माणिक वर्मा आणि पं. भीमसेन जोशी यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम त्यानंतर झाला.

प्रभा अत्रेंनी आपल्या गायनाची सुरुवात शाम कल्याण रागाने केली. हिराबाईंकडून सुराची, तालाची आणि लयीची तालीम मिळालेल्या या भाग्यवान गायिका! त्यांच्या गायनात हिराबाईंच्या गाण्यातील सौंदर्य तर असतेच पण आपली स्वत:ची प्रतिमा त्यांच्या गायनातून प्रत्ययाला येते. या दिवशीच्या गायनात याची पुन:प्रचीती आली. प्रभाताईंनी हिराबाईंचा वारसा त्यात भर टाकून चालविल्याचं समाधानही रसिक श्रोत्यांना आणि जाणकारांना मिळालं. त्यांच्या गायनातील सरगम अतिशय विलोभनीय असते. स्वरांची गुंफण त्या अतिशय कलात्मकतेनं करून रागाचे रूप साकार करायला मदतच करतात. शामकल्याणचा ठाय लयीतील ख्यालापेक्षा त्याचा द्रुत लयीतील तराणा अधिक चांगला वाटला. या रागाला कर्नाटकी ढंगाचा जो साज त्यांनी दिला त्यामुळे या रागाचे सौंदर्य अधिकच खुलले. शामकल्याणनंतरच्या ठुमरीतही त्यांनी आपली तयारी, नजाकत कलात्मकपणे पेश केली.

श्रीमती माणिक वर्मांचे गायन म्हणजे तलावातलं शीतल चांदणं अत्यंत साधं पण अवघड आणि तरीही लोभसवाणं आणि भुरळ पाडणारं, माणिकबाईंचं गाणं. त्यांनी शिवकंस राग सादर केला. ख्यालाचा विस्तार करताना त्या स्वरांचा असा काही कोमल आणि हळुवारपणे वापर करतात की सारं गाणंच आल्हाददायक होऊन जातं. तानांपेक्षा त्यांचा हा विस्तारच अधिक मोहून टाकणारा असतो. माणिकबाई किराणा घराण्याच्याच गायिका!

या घराण्याच्या गायकीतील स्वरांचं माधुर्य त्यांनी श्रोत्यांसमोर अतिशय हळुवारपणे उलगडवून दाखवलं. या रागानंतर त्यांनी दोन भावगीतं सादर केली.

किराणा घराण्याचा झेंडा अटकेपार लावणाऱ्या पं. भीमसेनजींचं गाणं हा एक सांगीतिक कलात्मक अनुभवच असतो. त्यांच्या स्वराचा लगाव, त्याचा विस्तार, त्यात असलेली उपजत लय आणि या सगळ्या पलीकडे असलेली त्यांच्या गायनातील आवाहकता यामुळे भीमसेन जोशींचं गाणं नुसतं श्रवणीय होत नाही तर त्यानंतर मनात राहून जातं. त्यांनी अभोगी राग सादर केला. संथ धीम्या आणि भारदस्त पद्धतीतलं त्यांचं गाणं रागाची एक प्रतिमाच साकार करीत असतं. ते गातात तेव्हा श्रोते नुसते तल्लीन होत नाहीत तर ते त्या स्वरांच्या प्रवाहात ओढले जातात. हा अनुभव त्या दिवशी पुन्हा एकदा आला आणि रसिक तृप्त झाले! 'सूर सुखध्वनि तू विमला' या नाट्यगीतानंतर पं. भीमसेनजींनी 'बाजूबंद खुले खुलेजा' ही भैरवी गायली. भैरवी म्हणजे किराणा घराण्याचे एक खास वैशिष्ट्य! स्वरांमधलं कारुण्य ते अशा पद्धतीनं अभिव्यक्त करतात की भैरवी म्हणजे गाण्याचा शेवट राहात नाही तर प्रारंभ होतो. भीमसेनांच्या या भैरवीनं या अमृतमहोत्सवसमारंभाची सांगता झाली!

हिराबाईंचा सत्कार खरं तर या सुरांनीच केला असं म्हटलं पाहिजे, □

मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे...

—प्रा. वा. ल. कुलकर्णी

(प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.
तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# गाझा ते गॅलिली : पृष्ठ ८ वरून

मध्ये ब्रिटिश फौजा जेरुसलेममध्ये प्रवेशल्या आणि त्याबरोबरच तिथल्या चारशे वर्षांचे तुर्की साम्राज्य संपुष्टात आले. पुढे ब्रिटनकडे इस्राइलची भूमी, तुर्की साम्राज्यातून जिंकलेल्या प्रदेशातील 'हक्काची' (Mandated) म्हणून आली (इ. स. १९२२). त्याआधी ब्रिटनने इ. स १९१७ मध्ये 'बेलफोर घोषणा' या नावाने प्रसिद्ध असलेली कल्पती जाहीर केली होती. तीमध्ये ज्यूसाठी पॅलेस्टाइनमध्ये एक राष्ट्रीय (Homeland for Jews) निर्माण करण्याचा इरादा मांडला होता. मात्र प्रत्यक्षात बेलफोर घोषणेला जेरुसलेममधील ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांनी विरोध केला. याचे कारण त्यांनी अरबांशी लागेबांधे जोडले होते. ब्रिटिशांच्या दुटप्पी धोरणामुळे परिस्थिती कारण नसता चिघळत गेली.

एक वेळ अशी होती की, अरबांचा प्रमुख प्रतिनिधी अमीर फैजल आणि ज्यूंचा प्रतिनिधी डॉ. खाइम् वाइझमान याच्यात समझोता होऊन पॅलेस्टाइनचे दोन भाग पडून त्यापैकी एकावर ज्यूंचे 'इस्राइल' निर्माण करायला फैजलने पाठिंबाही दिला होता. ब्रिटिशांनी या समझोत्याचा पाठपुरावा करण्याऐवजी तुरुंगात असलेला अतिरेकी व जहाल अरबनेता हाज अमीन याला सोडून दिले व सध्याच्या आत्यंतिक ज्यू व इस्राइल-द्वेषाने पछाडलेल्या अरब-धोरणाला जन्म दिला.

जुलै १९२२ मध्ये पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या 'लीग ऑफ् नेशन्स्'नं इंग्लंडवर ज्यूंचा स्वतंत्र प्रदेश निर्माण करण्याची जबाबदारी औपचारिकपणे टाकली. ब्रिटिशांनी त्याप्रमाणे पॅलेस्टाइनचे दोन भाग करून त्यापैकी एक ज्यूंचा व दुसरा अरबांचा स्वायत्त प्रदेश ट्रान्सजॉर्डन म्हणून घोषित केला.

ज्यूंचा स्वतंत्र प्रदेश निर्माण झाल्यावर जगभरच्या ज्यूंची पॅलेस्टाइनला रीघ लागली. आता प्रसिद्धीला आलेल्या बऱ्याच सामूहिक वसाहती (किबूट्झ्) याच वेळेस सुरू झाल्या. ब्रिटिशांनी 'फोडा व झोडा' या तत्त्वानुसार खुपदा अरबांची बाजू घेऊन ज्यूंच्या वसाहतीला विरोध केला. अर्थात् त्या विरोधाला न जुमानता जागतिक झायोनिस्ट चळवळ व ज्यूइश एजन्सी या संस्थांनी जगभरातून पैसा मिळवून वसाहती निर्माण करणे नेटाने चालू ठेवले.

पुढे दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नाझींनी ६० लक्ष युरोपियन ज्यू लोकांची राक्षसी कत्तल केली ! या वेळी हाज अमीनने उघडपणे नाझींशी संगनमत केले होते. या क्रौर्य आणि विद्रूप अमानुषतेच्या दाढेतून सुटलेले १ लाख ज्यू लोक कोठेही घरदार नाही, अशा परिस्थितीत इस्राइल भूमीमध्ये-पॅलेस्टाइनला आले तेथे काय घडले? तर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना परतवून लावले ! या वेळी पॅलेस्टाइनमधल्या ज्यू नागरिकांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटनविरुद्ध लढा चालू ठेवला.

## ज्यू राष्ट्राचा जन्म

शेवटी १९४७ मध्ये २९ नोव्हेंबर या दिवशी जवळजवळ दोन हजार वर्षांनी ज्यूंना न्याय मिळाला! अमेरिका व रशियासकट दोन-तृतीयांशपेक्षा अधिक बहुमताने इस्राइलची स्थापना संयुक्त राष्ट्रसंघात (यूनो) जाहीर झाली. यूनोने एक अपूर्व अशी ऐतिहासिक संधी ज्यू व अरब या दोघांना दिली. पूर्वीचा ट्रान्सजॉर्डनचा प्रदेश 'जॉर्डन' देश झाला आणि भूमध्य समुद्राच्या किनाऱ्याची रत्नागिरी जिल्ह्याच्या आकाराची चिंचोळी पट्टी 'इस्राइल' झाली !

या सुमारे चार हजार वर्षांच्या श्रोटक इतिहासाचा सारांश असा सांगता येईल-

१ : ज्यू व अरब मुसलमान हे एकाच प्रदेशातले व वंशाचे आहेत.

२ : इस्राइल भूमी दोघांना पवित्र आहे. दोन्ही जमातींनी तिथे सतत वास्तव्य केलेले आहे.

३ : अरेबिक व ज्यूंची हिब्रू भाषा अगदी जवळजवळ आहेत.

४. पूर्वी ज्यूंचेच राज्य या प्रदेशावर होते. गेल्या दोन हजार वर्षांत ग्रीक, रोमन, तुर्की या परकीय आक्रमकांनी जवळजवळ १५०० वर्षे राज्य केले तर इ. स. ६३६ ते १०९९ ही जवळजवळ पाचशे वर्षे राज्य अरबांनी केले.

५ : इतिहास असा आहे की, अरब व ज्यू यांपैकी कोणालाच पॅलेस्टाइनवर आपली मिरास व एकमेव हक्क सांगता येणार नाही (Exclusive monopoly Right). तो दोघांमध्येच वाटून घ्यावा लागणार !

म्हणजे अरब-इस्राइली संघर्षाचं मूळ कारण हेच की, एकच प्रदेश दोघांना पाहिजे होता. अशा तऱ्हेचा संघर्ष संपवण्याचा एकच मार्ग म्हणजे दोशत प्रदेशाची वाटणी करणे. 'संपूर्ण प्रदेश एकट्यालाच मिळाला असता, तर सोन्याहून पिवळे, पण हे जर शक्य नाही तर निम्मा तरी घ्या !' या स्वरूपाचे धोरण १९४७ साली यूनोने स्वीकारले व शांततेने राहायची संधी अरब व ज्यूंना, दोन देश निर्माण करून, प्राप्त करून दिली.

दुर्दैव हे की, हा तोडगा फक्त इस्राइलनेच स्वीकारला. जॉर्डन या अरब देशाला मान्यता दिली. ही सहिष्णु भूमिका अरबांनी स्वीकारली नाही. उलट 'आम्हाला एकट्यालाच संपूर्ण पॅलेस्टाइन पाहिजे, ज्यू राष्ट्र आम्ही स्वीकारणार नाही व इस्राइलचा नायनाट करणार अशी एकांगी आणि शत्रुत्वाची भूमिका त्यांनी घेतली !

## सध्यांच्या अरब-इस्राइली संघर्षाचे मूळ हे आहे.

बरे, ही नकारात्मक भूमिका घेऊन अरब देश थांबले नाहीत. नवजात इस्राइल देशाचे नाव आंतरराष्ट्रीय क्षेत्रात रुजू होण्याच्या आतच इजिप्त, जॉर्डन, इराक, सीरिया, लेबानन व सौदी अरेबिया इतक्या अरब देशांनी इस्राइलवर स्वारी केली ! इजिप्तचे सैनिक तेल अव्हिव्हपासून ३० किलोमीटरवर पोहोचले. जॉर्डनच्या सेनेने जेरुसलेम वेढले !

इस्राइलची लोकसंख्या त्या वेळी फक्त ६॥ लाख होती. सैन्य म्हणजे तुटपुंजं नागरी दलासारखंच होतं. तरी इस्राइली अत्यंत शौर्यानं व तडफेनं लढले व त्यांनी सर्व अरब देशांचा पराभव केला ! इजिप्त, जॉर्डन, लेबानन व सीरिया या देशांबरोबर १९४९ मध्ये इस्राइलनं तह केले. त्या करारात असं म्हटलेलं आहे की, इस्राइल व या देशांच्या सीमा पुढे वाटाघाटीतून ठरतील. याच १९४९ च्या सीमा म्हणजे १९६७ युद्धाच्या आधीच्या सीमा होत. यामध्ये एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सध्या सबंध जग ओरडून सांगतंय् (भारतासकट) की, इस्राइलनं अरबांचा १९६७ नंतर व्यापलेला प्रदेश सोडलाच पाहिजे ! खरी परिस्थिती ही आहे की, १९६७ च्या सीमा-म्हणजेच १९४९ च्या सीमा-ह्या अंतिम आंतरराष्ट्रीय सीमा नसून युद्धतहकुबीनंतरच्या प्रत्यक्ष प्रदेशाचं १९४९ मधलं नियंत्रण दाखविणाऱ्या आहेत. त्या लहानमोठ्या प्रमाणावर प्रदेशाची देवघेव करून वाटाघाटीत निश्चित व्हायच्या होत्या; पण 'इस्राइलबरोबर आम्ही कालत्रयी वाटाघाटी करणार नाही ! ' अशी राजकीय अस्पृश्यतेची भूमिका अरबांनी घेतली. (हे नकारात्मक धोरण इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष सादात यांनी १९७७ नंतर सुदैवानं सोडून दिलं आहे.) यातूनच १९५६, १९६७ आणि १९७३ ची अरब-इस्राइली युद्धं उभी राहिली !

ह्या सर्व हकीगतीत एक निखळलेला सांधा वाचकांना जाणवला असेलच. तो म्हणजे पॅलेस्टाइन मुक्ति आघाडी किंवा पी. एल्. ओ. (पॅलेस्टाइन लिबरेशन ऑर्गनायझेशन). या संस्थेचे सर्वाधिकारी

यासर अराफत परवाच दिल्लीला येऊन गेले. भारतानं आपली अरब–अनुनयाची परंपरा जागृत ठेवून जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यावर स्वतंत्र पॅलेस्टाइन राष्ट्र स्थापन करण्याला आणि पी. एल्. ओ. ला सर्व पॅलेस्टिनी जनतेची एकमेव प्रतिनिधि म्हणून मान्यता द्यावयाला पूर्ण पाठिंबा दिला. या निखळलेल्या साध्याला अरब–इस्राइली संघर्षात त्याच्या विशिष्ट स्थानावर बसवायचं तर परत आपल्याला १९४८ च्या इस्राइलच्या स्वातंत्र्य–युद्धाचा इतिहास तपासायला हवा.

सध्या सर्वत्र हेका ऐकू येतो की, पॅलेस्टिनी बेघर निराश्रित हे अरब–इस्राइली संघर्षाचे मूळ होत त्याचं स्वतंत्र पॅलेस्टाइन राष्ट्र व त्याचे हक्क प्रस्थापित होणं म्हणजे अरब–इस्राइली संघर्ष मिटणं होय. हे निराश्रित म्हणजे अरब–इस्राइली संघर्षाचं मूळ आहेत हे स्वीकारणं म्हणजे अरब प्रचाराला बळी पडणंच होय. मूळ कारण हे नसून अरबाना इस्राइल नकोच आहे आणि आपल्यालाच संपूर्ण पॅलेस्टाइन मिळावं हा त्यांचा वेडा आग्रह आहे.

१९४८ चं युद्ध सुरू असताना इस्राइलमधले जवळजवळ १० लाख अरब इस्राइल सोडून गेले. ते असे का गेले याचो निश्चित कारणं सांगणं अवघड आहे. कदाचित् ज्यूंच्या राज्यात आपण सुरक्षित राहणार नाही असं त्याना वाटलं असावं कदाचित् 'आपले' अरब बांधव—म्हणजे इजिप्त, सौदी अरेबिया, जॉर्डन इत्यादी आपल्याला जास्त चागली वागणूक देतील असं त्याना वाटलं असावं. घटकाभर आपण असं म्हणू की, या १० लाख लोकांना इस्राइलनं हाकलून दिलं! (अरब राष्ट्रं असंच म्हणतात!)

## ज्यू निर्वासित

तर काही असो हेच ते १० लाख बेघर पॅलेस्टिनी निराश्रित. आतापर्यंत ते १५ लाख झालेत! याचं पुनर्वसन अद्याप झालेलं नाही ही वस्तुस्थिति आहे; पण या प्रश्नाची दुसरी बाजू आपण बघत नाही. ती ही की, याच वेळी तितक्याच ज्यू लोकाना आपापल्या सर्व देशातून याच अरब देशांनी हाकलून दिलं. तेही बेघर निराश्रितच झाले. म्हणजे जर अरब निराश्रिताची समस्या होती तर ज्यू निराश्रिताचीही तेवढीच बिकट समस्या होती. सत्य इतकंच आहे की, इस्राइलनं या सर्व लक्षावधी ज्यू निराश्रितांचं अतोनात खर्च करून पुनर्वसन केलं व ही समस्या सोडविली. अरब देशानी त्याचा भार उचलून पॅलेस्टिन निराश्रिताचे पुनर्वसन केले असते, तर काही प्रश्नच उरत नव्हता; पण अरब राष्ट्रांनी अगदी ज्वलज्जहाल गदाफी (लिबिया) काय किंवा रॅडिकल बुमेदियन (अल्जेरिया) काय किंवा आपल्या अरब अनुनयधोरणाची पूज्य मूर्ती नासर काय (इजिप्त) यांनी ह्या निराश्रितांसाठी कपर्दिकसुद्धा खर्च केली नाही! पुनर्वसन तर बाजूलाच राहिले!

आता अरबाकडे पैसा थोडा नाही. आज जग विकत घेऊ शकतील एवढा पैसा तेलाने त्याच्याकडे दिला आहे. उदाहरणार्थ, सौदी अरेबि यामध्ये प्रतिवर्षी प्रत्येक नागरिकाला–यामध्ये स्त्रिया, मुले व वृद्ध मंडळीही आली–१५००० डॉलर्स मिळतील एवढा पैसा तेलामुळे येतो; पण हे अरब देश पी. एल्. ओ. ला पॅलेस्टिनीच्या पुनर्वसनासाठी पैसुद्धा देत नाहीत देतात फक्त एकच गोष्ट-ती म्हणजे शस्त्रास्त्रं!

अरब राष्ट्रांनी या पॅलेस्टिनी निराश्रिताचा एकच उपयोग आतांपर्यंत करून घेतला आहे. तो म्हणजे त्यांची प्यादी केलीत. एकीकडे इस्राइलचा बागुलबुवा करून अंतर्गत भांडणे आणि बनावांना मुरड घालायची आणि दुसरीकडे पी. एल्. ओ. ला शस्त्रं देऊन पॅलेस्टिनी गनिमाना इस्राइलचा नाश हे ध्येय देऊन लढायला लावायचे. यामुळ त्यांची दोन उद्दिष्ट साध्य होतात–एक तर पॅलेस्टिनी गनीम स्वतः-पासून दूर राहतात आणि दुसरे म्हणजे इस्राइलविरुद्ध द्वेषाची ज्योत प्रज्वलित ठेवल्यामुळे बाहेरून तरी अरब–एकता दाखवता येते.

अरब देशाना पी. एल्. ओ. विषयी व पॅलेस्टिनी गनिमांविषयी काय वाटते हे बघायचे असेल तर १९७० मधले जॉर्डनमधले राजकारण हे खास उदाहरण आहे. त्या वेळी वाचकाना आठवेल की, ब्लॅक सप्टेंबर या दहशतवादी गँगने एका ७४७ जंबो जेट विमानाला आग लावली होती. या वेळी जॉर्डनचे राजे हुसेन यांनी एक निश्चय केला, 'जॉर्डनवर एक आराफातचे (पी. एल्. ओ.) राज्य असेल किंवा माझे!' त्यानी त्या वेळेला जवळजवळ ३५००० पॅलेस्टिनी गनीम स्त्रिया आणि मुले यांची निर्घृणपणे हत्या केली आणि पॅलेस्टिनी समस्या जॉर्डनपुरती सोडविली! गेल्या ३० वर्षांत इस्राइलबरोबरच्या युद्धांत जेवढे अरब सैनिक मृत्युमुखी पडले, त्यांच्या अनेक पट पॅलेस्टिनी अरबांच्या गोळ्यानी मृत्युमुखी पडलेत.

आता जागतिक लोकमत असे केंद्रीभूत व्हायला लागलेय की, अरब–इस्राइली संघर्षाची कारणमीमांसा काही असो, तीवर इस्राइलचे वाजवी किंवा अवाजवी म्हणणे काही असो, पॅलेस्टिनी निराश्रितांची समस्या ही सोडवलीच पाहिजे! पाश्चिमात्याना अरबाचे तेल पाहिजे, अरबाना पॅलेस्टिनी गनीम डोईजड झालेत, इस्राइल अकारण ताठर आहे अशी समजूत दृढ होत चालली आहे, अशा अनेक कारणामुळे जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यावर स्वतंत्र सार्वभौम पॅलेस्टिनी राष्ट्र, पी. एल्. ओ च्या आधिपत्याखाली निर्माण झाले तर अरब–इस्राइली संघर्ष सुटेल, अशी काहीशी भोळी–भाबडी व आशावादी विचारधारणा युनोमध्ये निर्माण झाली आहे.

हे पॅलेस्टिनी राष्ट्र निर्माण झाले, तर ते काही ठिकाणी इस्राइलपासून इतके 'जवळ' येईल की, ते राष्ट्र आणि भूमध्य समद्र याच्यामध्ये इस्राइलची रुंदी फक्त ८ ते १० मैलच राहील. अशा वेळी 'इस्राइलचा सर्वनाश' हे एकमेव ध्येय म्हणवणाऱ्या यासर अराफतना इस्राइलचे दोन तुकडे करण्याचा मोह होणार नाही असे म्हणणे साहसासेच होईल.

नाखुम जेव्हा इजिप्शियन आघाडीवर गाझा पट्टीमध्ये होता तेव्हाची हकीगत त्याने सागितलीन्. त्याने स्वतः अल फताहचे गनीम पाच पौंडाच्या भांडणावरून एकमेकावर हँडग्रेनेड फेकताना पाहिले आहेत त्याच्या मते जे हिंसेला एवढे वाहिलेले आहेत, ते इस्राइलशी शांतता व सहजीवन वगैरे गोष्टी बोलतील हे अशक्य आहे.

नाखुमची गोष्ट आपण सोडून देऊ; कदाचित ती पूर्वग्रहदूषित असेल. मला जेरुसलेमला युनोचे एका आशियाई देशामधले अधिकारी भेटले. (त्याना दिलेल्या वचनानुसार त्याचे नाव मी देऊ शकत नाही.) ते जेरुसलेममध्ये गेली १६ वर्षे आहेत. त्यांनी स्वतंत्र पॅलेस्टिनी राज्याचा जोरदार पुरस्कार केला त्याच्या मते 'पॅलेस्टाइन' स्वतंत्र राज्य उभारू देणे ही इस्राइलच्या दृष्टीने सुवर्णसंधी आहे. कारण त्याच्या मते ह्या राष्ट्रापेक्षा इस्राइल नेहमीच अनेकपटीनी श्रीमंत राहील व ते पॅलेस्टिनी राज्याचे कर्जदार झाले, तर त्या राज्याला आर्थिक वेटोळ्यात बांधून 'अंकित' करील. यामधूनच काहीशी लादलेली शातता निर्माण होऊ शकेल; पण मी जेव्हा त्याना विचारले, 'पण यासर अराफात असे कुठे म्हणताहेत की, आम्हाला स्वतंत्र राष्ट्र दिल्यावर आम्ही इस्राइलला मान्यता देऊ म्हणून?' तेव्हा हे अधिकारी निरुत्तर झाले! म्हणजे त्याचीच काय, सगळ्या जगाची सध्या एकतर्फी अपेक्षा आहे की, इस्राइलने पी. एल्. ओ. च्या दहशतवादी स्वतंत्र राष्ट्राला मान्यता द्यावी; पण पी. एल्. ओ. ने इस्राइलला मान्यता द्यायलाच पाहिजे असे काही नाही.

या पार्श्वभूमीवर इजिप्त–इस्राइलचा १९७९ चा शांतता–करार आणि त्याची फलश्रुती तपासणे मनोरंजक होईल. [ क्रमशः ]